


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्मूला ठरला

## एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात ५ तास मॅरेथॉन चर्चा

ठाणे : (समर्थ गांवकरी)

मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातील युतीचे अडलेले घोड अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. उद्धव आणि राज ठाकरे बुधवारी युतीची घोषणा , करत असताना महायुतीचे जागा वाटपही अंतिम टप्प्यात आल्याची माहिती या दोन्ही पक्षातील विश्वसनिय सुत्रांनी दिली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी रात्री उशीरा भेट दिली. यावेळी कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, माजी खासदार राहूल शेवाळे हेदेखील उपस्थित होते. एकनाथ शिंदे आणि रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत तब्बल पाच तास युतीच्या जागा वाटपाची चर्चा सुरु होती. एमएमआर प्रदेशातील सर्वच महापालिकांमध्ये युती करण्याबाबत यावेळी एकमत करण्यात आल्याचे सुत्रांनी सांगितले.

राजकीय चर्चेपलिकडे अनेक विषयांवर हास्यविनोद करत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा पार पडली, अशी माहिती या बैठकीनंतर खासदार नरेश म्हस्के यांनी पत्रकारांना दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांचे कर्तृत्व आणि कार्यकौशल्याबद्दलही बराच वेळ या बैठकीत चर्चा झाली. बैठकीला उपस्थित प्रत्येकाने मोदीजींसोबतचे आपले वैयक्तिक अनुभवही शेअर केले, असेही म्हस्के यांनी यावेळी सांगितले. मुंबई तसेच कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईदर यासारख्या महापालिकांमध्ये शिंदे आणि भाजप या दोन पक्षात जागा वाटपावरुन कमालिची रस्सीखेच सुरु आहे. ठाण्यातही भाजपचे नेते ४२ जागांसाठी आग्रही आहेत.

कल्याण डोंबिवलीत भाजपचाच महापौर करा असे आवाहन खुद्द रविंद्र चव्हाण सातत्याने करताना दिसत आहे. या शहरात डॉ.श्रीकांत शिंदे आणि चव्हाण यांच्यातील राजकीय स्पर्धा टोकाला पोहचली आहे.

### काय ठरला फॉर्म्युला ?

ठाणे, कल्याण डोंबिवलीसह मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील (एमएमआर) महापालिकांमधील युतीची घोषणा अंतिम टप्प्यात असल्याचे यावेळी झालेल्या बैठकीनंतर स्पष्ट करण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत याठिकाणी युती झालीच पाहीजे असा निर्णय या बैठकीत झाल्याचे समजते. येत्या दोन दिवसात स्थानिक पातळीवर प्रभाग स्तरावरील उमेदवारांची चर्चा केली जाईल असेही या बैठकीत ठरले. या जागा वाटपाची अधिकृत घोषणाही लवकरच केली जाईल, असा निर्णय घेण्यात आला. नवी मुंबई तसे मिरा-भाईदरमधील अडलेल्या जागा वाटपाची चर्चा कधी आणि कशा पद्धतीने सुरु करायची याविषयी देखील या बैठकीत खल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

## थोडक्यात...

### हुडहुडी भरवणारी थंडी, अन् बिबट्याची भीती

नीरा (समर्थ गांवकरी) : पुरंदर तालुक्यातील वाल्हे व आसपासच्या परिसरात सध्या बिबट्याने मोठ्या प्रमाणात त्रास वाढवला आहे. त्यातच मोठ्या प्रमाणात थंडीची लाट यायची सुरु आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना वीज वितरण कंपनीकडून आठवड्यातून जास्तीत जास्त वेळ रात्रीचा वीजपुरवठा केला जात आहे. त्यामुळे शेतकरी अत्यंत त्रस्त झाला आहे आणि आता दिवसा वीज देण्याची मागणी करत आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या या अडचणीकडे राजकीय नेते सोयीस्कर पद्धतीने दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन नीरा येथील वीज वितरण कार्यालयावर धडक देऊन दिवसा वीज दिली जावी अशी मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. वाल्हे व परिसरात वीज वितरण कंपनी शेतीसाठी रात्रीच्या वेळीच वीजपुरवठा करत आहे. हाताशी आलेले पीक वाया जाऊ नये, म्हणून शेतकरी रात्री थंडीच्या लाटेतही कुडकुडून आपल्या पिकाला पाणी देत असतो. मात्र, अशा वेळी वीज अचानक बंद पडते. डीपीतील फ्युज खराब होणे, लिंक खालावणे यांसारख्या घटनांमुळे शेतकऱ्यांना त्रास होतो; परंतु जेव्हा शेतकऱ्यांनी वीज वितरण कर्मचाऱ्यांना फोन करून दुरुस्तीची मागणी केली, तेव्हा कर्मचाऱ्यांकडून "थंडी फार आहे आणि परिसरात बिबट्या फिरतो, आम्ही येऊ शकत नाही", असे सांगितले जाते. परिणामी शेतकरी रात्रभर ताटकळत राहतो व त्याचा एक दिवस वाया जातो.

### 2025 ऐवजी 2015 चा शिक्का..!

चाकण (समर्थ गांवकरी) : चाकण नगरपरिषद पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या मतमोजणी व निकाल प्रक्रियेत धक्कादायक आणि अत्यंत गंभीर प्रकार उघडकीस आला असून, अधिकृत मतांची आकडेवारी असलेल्या निकाल प्रती तसेच निवडून आलेल्या विजयी उमेदवारांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांवर 2025 ऐवजी थेट 2015 सालाचा अधिकृत शिक्का मारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार म्हणजे केवळ तांत्रिक चूक नसून, निवडणूक आयोग आणि नगरपरिषद प्रशासनाच्या कामकाजातील भयंकर निष्काळजीपणाचे उदाहरण असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. लोकशाहीचा कणा असलेल्या निवडणूक प्रक्रियेत अशी घोडचूक होणे हे अत्यंत गंभीर असून, यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### भेसळयुक्त भंडाऱ्यावर कारवाईचा बडगा

जेजुरी (समर्थ गांवकरी) : खंडोबा गडावर घडलेल्या भंडाऱ्याच्या दुर्घटनेनंतर अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले असून, सोमवारी (दि. 22) जेजुरी शहरात धडक कारवाई करण्यात आली. प्रशासनाच्या वर्षा बारवकर, रजिया शेख, लक्ष्मीकांत सावळे, डॉ. संदीप शिंदे आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी खंडोबा गडाच्या मुख्य महाद्वारासह शहरातील विविध ठिकाणी भंडारा विक्रेत्यांची तपासणी केली. यावेळी भेसळयुक्त भंडाऱ्याचे संशयित नमुने ताब्यात घेण्यात आले असून, बेळगाव येथून भंडारा पुरवठा करणारा टेम्पो जप्त करण्यात आला. जेजुरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे, अण्णासाहेब देशमुख व पोलिस पथक या कारवाईत सहभागी झाले होते. ही तपासणी रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

# पुणे महापालिकेतील विरोधक संपविण्याची भाजपची रणनीती

पुणे : (समर्थ गांवकरी)

महापालिकेत पाच वर्षे ९७ नगरसेवकांच्या मदतीने एकहाती सत्ता उपभोगणाऱ्या आणि राज्य सरकारच्या मदतीने गेल्या पावणेचार वर्षापासून प्रशासकाच्या मदतीने महापालिका चालविणाऱ्या भारतीय जनता पक्षाने पुण्यात विरोधकच ठेवायचा नाही, याची रणनीती आखली असल्याने सर्वच पक्षातील इच्छुकांना प्रवेश देण्याची तयारी सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यात २२ जणांना पक्षप्रवेश दिल्यानंतर आता टप्प्याटप्प्याने आणखी काहींना प्रवेश दिले जाणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. महापालिकेत असलेल्या १६२ जागांपैकी केवळ ६२ जागा राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना, मनसे आणि एमआयएम आणि अपक्ष म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांच्या वाट्याला आल्या. पुणे महापालिकेच्या इतिहासामध्ये स्वबळावर यश संपादन केलेला भाजप हा पहिलाच पक्ष ठरला होता. एवढ्या मोठ्या प्रमाणात एकाच पक्षाचे उमेदवार विजयी झाल्याने महापालिकेच्या सभागृहात भारतीय जनता पक्षाची ताकद वाढली.

शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी कोणतीही भूमिका, कल्याणकारी योजना राबविण्याचा निर्णय घ्यायचा झाल्यास भाजपला कोणाच्याही कुबड्यांची गरज पडत नव्हती. महापालिकेच्या सभागृहामध्ये प्रस्ताव मांडायचा आणि संख्याबळाच्या जोरावर तो मान्य करून घेण्याचे धोरणच भाजपने महापालिकेत सुरू केले होते. महापालिकेच्या सभागृहात भाजपच्या नगरसेवकांची संख्या १०० पेक्षा अधिक होती. त्यातुलनेत विरोधी पक्षाच्या बाकांवर बसलेल्या नगरसेवकांची संख्या बोटावर मोजण्या इतकीच असली तरी महापालिकेत सभासद म्हणून काम करण्याचा असलेला अनुभव आणि विषयांचा असलेला अभ्यास याच्या जोरावर विरोधात बसलेले नगरसेवक वेळ प्रसंगी सत्ताधारी पक्षातील सदस्यांची गंमत करून चांगलीच धांदल उडवून देत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाची असलेली लाट यामुळे भाजपच्या नवख्या उमेदवारांनी प्रतिष्ठित आणि राजकारणात कसलेल्या विरोधी पक्षाच्या उमेदवारांचा दारूण पराभव केला होता. महापालिकेच्या सभागृहात भाजपच्या विजयी सदस्यांची संख्या १०० असली तरी महापालिकेच्या महत्त्वाच्या पदांवर आणि समितांवर पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी केवळ बोटावर मोजण्या इतक्या भाजप पदाधिकाऱ्यांनाच देण्यात आली. महापालिकेचा पाच वर्षाचा संपूर्ण कारभार हा ठराविक पदाधिकारीच पाहत होते. यामध्ये महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेते या पदापासून अन्य इतर महत्त्वाच्या पदांचाही समावेश होता. महापालिका सभागृहाच्या पाच वर्षाच्या काळामध्ये केवळ सहा ते सात वरिष्ठ सभासदांनीच महत्त्वाची पदे उपभोगली. इतर सभासद हे केवळ सभागृहात मतदानासाठी हाताचे बोट करण्यापुरतेच मर्यादित राहिले. महापालिकेत पहिल्यांदा निवडून आलेल्या सभासदांना महत्त्वाच्या पदांवर कोणतीही संधी देण्यात आली नाही. इतकेच नव्हे तर इतर पक्षातून भाजपमध्ये जाऊन विजयाची पताका फडकाविलेल्या अनेक सभासदांना अखेरपर्यंत महत्त्वाची जबाबदारी न देण्याचे धोरणच जणू भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी स्वीकारले होते.

# वाघिणीचे मध्य प्रदेशातून हेलिकॉप्टरद्वारे राजस्थानमध्ये स्थलांतर

नागपूर : (समर्थ गांवकरी)

मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पातून राजस्थानमध्ये एका वाघिणीचे हवाईमार्गे स्थलांतर करण्यात आले. वाघिणीच्या स्थानांतरणासाठी हवाई मार्गाचा वापर करण्याची देशातील ही पहिलीच घटना आहे. 'पीएन-२२४' नावाच्या या तीन वर्षांच्या वाघिणीचे राजस्थानमधील रामगढ विषधारी व्याघ्र प्रकल्पात स्थलांतर करण्याची ही मोहीम रविवारी रात्री साडेदहा वाजता यशस्वीरित्या पार पडली. हवाई दलाच्या 'एमआय-१७' हेलिकॉप्टरद्वारे हे स्थलांतर करण्यात आले. जयपूरहून वाघिणीला रस्तेमार्गे राजस्थानमधील रामगढ विषधारी व्या घ्रप्रकल्प (बुंदी) येथे नेण्यात आले. सुमारे अडीच तासांचा हा हवाई प्रवास होता. या मोहिमेची तयारी सुमारे महिनाभर सुरू होती. वाघिणीची हालचाल, क्षेत्र आणि दैनंदिन वावर यावर लक्ष ठेवण्यासाठी कुरई व रुखाड वनक्षेत्रात सुमारे ५० एआय-सक्षम कॅमेरा ट्रॅप व मोशन सेन्सर कॅमेरे बसवण्यात आले होते. शनिवारी सर्व हालचाली पूर्वनियोजित योजनेनुसार करण्यात आल्या. वन्यजीव पशुवैद्यकांनी वाघिणीला अत्यंत काळजीपूर्वक बेशुद्ध केले आणि विशेष क्रेटमध्ये ठेवून ठरवलेल्या हेलिपॅडपर्यंत नेण्यात आले. रविवारी पहाटे 'एमआय-१७' हेलिकॉप्टरने उड्डाण केले. उड्डाणादरम्यान मध्य प्रदेश व राजस्थानमधील वरिष्ठ पशुवैद्यक आणि वनाधिकारी वाघिणीच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून होते. रस्तेमार्गाऐवजी हवाई मार्ग निवडल्याने प्रवासाचा कालावधी कमी झाला आणि वाघिणीवरील ताणही कमी ठेवता आला, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# एकनाथ शिंदे यांना आता घराणेशाहीचा जाच; नातेवाईकांच्या उमेदवारीसाठी मातब्बरांचे दबावतंत्र

नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)

वनमंत्री गणेश नाईक यांच्यावर एकेकाळी घराणेशाहीचा आरोप करत नवी मुंबईत त्यांची सत्ता उलथवून लावण्याची भाषा करणाऱ्या एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही नवी मुंबईत घराणेशाहीच्या गर्तेत सापडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. बेलापूरपासून ऐरोलीपर्यत पक्षातील माजी नगरसेवक, मातब्बर नेत्यांकडून नातेवाईकांना उमेदवारी मिळावी यासाठी दबावाचे राजकारण केले जात असून परपक्ष्यातील नेत्यांना पक्षात आयात



करण्याची खेळी शिंदे यांच्या अंगलट येते की काय असे चित्र आहे. तुर्भे, कोपरखैरणे, नेरूळ, बेलापूर, ऐरोली भागातील नेत्यांनी तर घरातच दोन, चार आणि काही ठिकाणी सहा तिकीटांचा आग्रह धरल्यामुळे शिंदेसेनेतील रणनितीकार चक्रावून गेले आहेत.

नवी मुंबईत गणेश नाईक यांना धक्का देण्यासाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुरुवातीपासून पक्षाचे बळ वाढविण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवल्या. उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या पक्षातील माजी नगरसेवकांना गळाला लावणे, त्यांना योग्य ती रसद पुरविणे, महापालिकेतील कामे मार्गी लावणे अशा पद्धतीची आखणी शिंदे यांच्या पक्षाकडून करण्यात आली.

सद्यस्थितीत नवी मुंबईत शिंदे यांच्या पक्षाकडे ५० पेक्षा अधिक माजी नगरसेवक आहेत. त्यामुळे भाजपबरोबर जागा वाटपाच्या चर्चेत शिंदे यांचा वाटाही वाढला आहे. युती झालीच आणि ज्या पक्षाचे नगरसेवक त्याची जागा असे सूत्र ठरले तर भाजपला नवी मुंबईत शिंदेसेनेसाठी ४५ टक्क्यांपेक्षा अधिक जागा सोडाव्या लागतील. या जागा वाटपात मोठा भाऊ भाजपच ठरेल हे जरी खरे असले तरी ५० पेक्षा अधिक जागा शिंदेसेनेला सोडावे लागणे हा नाईकांसाठी धक्का ठरू शकतो. नेमके हे गणित लक्षात घेऊनच शिंदे यांनी परपक्ष्यातील माजी नगरसेवकांना गळाला लावले. मात्र ही संख्यावाढ वेगळ्या अंगाने आता शिंदे यांच्यासाठीच डोकेदुखी ठरू लागली आहे. बेलापूरपासून ऐरोलीपर्यत शिंदेसेनेत प्रभाव राखून असलेल्या नेत्यांनी आपल्या नातेवाईकांसाठी उमेदवारी मागण्याचा धडाका लावला आहे. उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि शरद पवार पक्षातील माजी नगरसेवकांनी सहा महिन्यांपूर्वी पक्षात प्रवेश केला. यातील बहुसंख्य नगरसेवकांनी स्वत:सह बायको, मुलगी, मुलासाठी उमेदवारी मागितली आहे.

# ठाकरे बंधु : आज १२ वाजता युतीचा नगारा

## नाशिक, पुण्यातही एकत्र; मुंबई महापालिकेतील संभाव्य जागावाटप


मुंबई : (समर्थ गांवकरी)

'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी' ही ५ जुलैच्या मोर्चाच्या वेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेली घोषणा अखेर प्रत्यक्षात येत आहे. गेली अनेक दिवस प्रतीक्षा असलेल्या शिवसेना व मनसेच्या युतीची घोषणा उद्धव ठाकरे व मनसेप्रमुख राज ठाकरे हे संयुक्त पत्रकार परिषदेत उद्या, बुधवारी करणार आहेत.

शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या युतीची घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे करतील, अशी माहिती शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी एक्सवरील संदेशाद्वारे दिली. मुंबईसह पाच महापालिकांत शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीची चर्चा काही दिवसांपासून सुरू होती. मात्र जागावाटपावर निश्चित होत नसल्याने घोषणा लांबणीवर पडली होती. सोमवारी रात्री जागावाटपाची चर्चा संपल्यानंतर राऊत यांनी घोषणेची माहिती दिली.

हिंदी सक्तीच्या विरोधात झालेल्या आंदोलनातील यशाबद्दल विजयोत्सव वरळीच्या डोममध्ये दोन भाऊ एकत्र आले, त्याच दिवशी युतीची निश्चिती झाली होती. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी युती स्वीकारली असून कोणाच्याही मनात संभ्रम नाही. दोन्ही पक्षांकडून सूचना गेलेल्या असून त्याआधीच कार्यकर्त्यांमध्ये जो उत्साह आणि मनोमीलन झाले आहे, ते अनुभवायला मिळत असल्याचे राऊत यांनी सांगितले.

युतीची घोषणा होणार असली तरी जागावाटप गुलदस्त्यात ठेवण्यात येईल. फाटाफूट टाळण्यासाठी ऐनवेळी उमेदवारी अर्ज भरण्याला प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे. जागावाटपावर कुठेही ताणतणाव, रस्सीखेच किंवा भांडण नाही. जागा कुणाकडे राहते यापेक्षा मराठी माणसाच्या युतीतून ती जिंकून येणे महत्त्वाचे आहे, असेही



राऊत यांनी स्पष्ट केले. नाशिकची चर्चा पूर्ण झाली असून पुणे, कल्याण-डोंबिवलीचा विषय संपलेला आहे. ठाणे आणि मीरा-भाईंदरमध्येही जागावाटपाचा विषय उरलेला नाही असे राऊत यांनी नमूद केले.

शिवसेना (ठाकरे) १५५ ते १६० जागा लढवेल. राष्ट्रवादी बरोबर आल्यास ठाकरे गटाकडील जागांमधून त्यांना २० जागा देण्यात येतील. महाराष्ट्र नवनिर्माण सेना ६५ ते ७० जागांवर निवडणूक लढवेल. दादर, माहीम, शिवडी, भांडुप आणि विक्रोळी यांसारख्या मराठीबहुल भागांतील जागांवरून असलेला पेच चर्चेतून सोडवण्यात आल्याचे समजते. जिथे ज्याची ताकद जास्त तिथे त्याला संधी, असे सूत्र ठरले आहे.

मुंबईत काँग्रेसशी युती होण्याची शक्यता धूसर आहे. निकालानंतर एकमेकांना कशी मदत करता येईल, यावर वरिष्ठ पातळीवर चर्चा झालेली आहे. निकालानंतर परिस्थिती निर्माण झाली आणि काँग्रेसची मदत लागली, तर ती घेतली जाईल, असेही राऊत यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशी जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. ती यशस्वी झाल्यास उद्या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित राहतील.



# जि. प. प्रा. शाळा वडगाव आनंद शाळेची सहल उत्साहात

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**

सालाबाद प्रमाणे जाणाऱ्या सहलीची गेले दीड महिना विद्यार्थी ज्या दिवसाची चातकाप्रमाणे वाट पाहत होते तो दिवस उजाडला. बुधवार (दि. १७)रोजी जि प प्रा. शाळा वडगाव आनंद शाळेची शैक्षणिक सहल स्वराज्य राजधानी रायगड येथे गेली. शाळेचे शिक्षक पालक व विद्यार्थी पहाटे साडेतीनलाच शाळेत आले होते. एसटी बस येताच विद्यार्थी भान हरपून जाऊन एसटीमध्ये जाऊन बसले. छत्रपती शिवाजी महाराज की जय...... या घोषणेने बस दुमदुमली, रोपवेच्या सहाय्याने विद्यार्थी रायगडवर पोचल्यावर शिक्षकांनी त्यांना रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा दरबार, धान्य कोठारे , गंगासागर तलाव ,राजधानीच्या कचेऱ्या , .जगदीश्वर मंदिर ,होळी चौक ,सैनिकांची घरे ,टकमक टोक , महादरवाजा अष्टप्रधानांचे



वाडे इत्यादी वास्तूंविषयी माहिती सांगितली . छत्रपती शिवरायांच्या वास्तव्याने व इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारी ठिकाणे याविषयीचा इतिहास शिक्षकांनी उलगडून दाखवला.

रायगड पाहताना मुलांच्या चेहऱ्यावरचे औत्सुक्य ,आनंद हे भाव लपत नव्हते . रोपवे मध्ये बसताना आनंद व भय हे दोन्ही भाव संमिश्रपणे दिसत होते. रोपवे कार्यालयातील ऐतिहासिक शस्त्रे पाहून चेहऱ्यावर आश्चर्य मावत देखील नव्हते . छत्रपती शिवरायांविषयीच्या अधिकच्या माहितीमुळे त्यांच्या ज्ञानात भर पडत असल्याने एक वेगळेच तेज चेहऱ्यावर दिसत होते. खरोखर रायगड हा एक अलौकिक वास्तुपुरुष आहे. सुमारे एक महिन्यांचे नियोजन ,विविध परवानग्या हे सारे सोपस्कार पूर्ण करून मुलांची रायगड मोहीम फत्ते झाली. या बाल मावळ्यांच्या सेनेकरीता आपल्या ओतूर गावाच्या निवासी असणाऱ्या कुमुदिनी चव्हाण -डुंबरे, संस्थापक तथा प्राचार्य न्यू इंग्लिश स्कूल चोचिंदे ता.महाड यांनी सुरूची भोजनाची व्यवस्था केली, त्यांनी मुलांबरोबर गप्पा मारल्या व जेवणाचा आस्वाद घेतला.

मुलांना सहलीत पिण्याच्या पाण्याच्या बॉटल्स डी. बी. (नाना ) वाळुंज सामाजिक कार्यकर्ते तथा शाळेचे शिक्षण तज्ञ सदस्य यांनी उपलब्ध केल्या. नारायणगाव एस .टी आगाराचे .वाहतूक नियंत्रण अधिकारी श्री वायकर साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले. जुन्नर तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी अशोक लांडे यांचे सर्वच बाबतीत मार्गदर्शन मिळाले तसेच नारायणगाव एसटी आगाराचे बस चालक जाधव यांनी सुखरूपपणे एसटी प्रवास घडवला .सहल यशस्वी व्हावी म्हणून शालेय व्यवस्थापन अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील, उपाध्यक्ष ज्योती गडगे, सर्वच सदस्य तसेच विशेष मेहनत शाळेच्या शिक्षिका छाया डुंबरे , सुनंदा तांबे, सविता खेत्री, गीतांजली वाळुंज व शाळेचे मुख्याध्यापक सुनील टिकेकर यांनी घेतले.

# श्री ढोकेश्वर विद्यालयात शाळा समितीची सभा संपन्न

**टाकळी ढोकेश्वर: (समर्थ गांवकरी)**

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयात, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त आदरणीय श्री. सितारामजी खिलारी उर्फ अण्णा यांच्या अध्यक्षतेखाली शाळा समितीची सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेसाठी संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिल व शाळा समितीचे सदस्य सन्मा. डॉ. अभयजी खानदेशे साहेब, सन्मा. श्री. दिपकजी दरे साहेब, माजी चेअरमन सन्मा. बबनराव पायमोडे सर उपस्थित होते.

■ विद्यालयासाठी खिलारी परिवाराचा मोठा त्याग- सिताराम खिलारी पा.

याप्रसंगी जेष्ठ विश्वस्त आदरणीय अण्णांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले की, 1960 मध्ये या विद्यालयाची स्थापना झाली असून, या विद्यालयासाठी खिलारी परिवाराचा मोठा त्याग आहे. कै. काशिनाथ खिलारी पाटील, कै. विश्वनाथ खिलारी पाटील, कै. कृष्णराव खिलारी पाटील यांनी विद्यालयासाठी जमीन उपलब्ध करून दिली. म्हणून आज संस्थेच्या मालकी हक्काच्या या सुंदर इमारतीत इयत्ता पाचवी ते बारावीचे जवळजवळ पंधराशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शुक्रवार दिनांक 19/12/2025 रोजी विद्यालयात, संस्थांतर्गत शाळा समितीची सभा पार पडली. विद्यालयाच्या लेझीम पथकाने मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी विद्यालयात मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यालयातील गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अहिल्यानगर गणित अध्यापक मंडळामार्फत, श्री. मल्हारी वाघस्कर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, विद्यालयाचे प्रसिद्ध चित्रकार श्री. नारायण शेळके यांना उत्कृष्ट चित्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा प्राप्त विद्यार्थ्यांचा व तालुका स्तरावर गणित विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा, गणित विज्ञान प्रदर्शनासाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा पाहुण्यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.अभयजी खानदेशे, श्री. दिपकजी दरे साहेब, श्री. बबनराव पायमोडे सर यांनी विद्यालयाने राबविलेल्या सर्व उपक्रमांचे व शैक्षणिक कामकाजाचे कौतुक केले. या वयात ही अण्णा किती उमेदीने काम करतात. त्यांच्यामुळेच विद्यालयाचा कायापालट झालेला आहे. ते आज ही अतिशय उत्साहाने प्रत्येक कार्यक्रमात सहभाग घेतात.

# अखिल भारतीय बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांचा पदाधिकाऱ्यांकडून सत्कार

■ बजरंग दल हे देशातील तरुणांचे मोठे संघटन- अँड. जय भोसले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

देशात बजरंग दलाच्या पन्नास हजाराहून अधिक शाखा आहेत. बजरंग दल हे तरुणांचे मोठे संघटन आहे.हिंदुत्वाच्या कार्यात पूर्वीपासूनच अहिल्यानगर जिल्हा अग्रेसर आहे.बजरंग दलाचे कार्यकर्ते गो सेवेच्या कार्यात मोठे योगदान देत आहेत.

बजरंग दलाच्या माध्यमातून देशात सर्वात मोठे रक्तदान शिबिर भरविले जाते.ज्या ज्या वेळेस देशावर संकटा येतात. त्यावेळेस बजरंग दलाचे कार्यकर्ते देश सेवेच्या कार्यात असतात.विवेक कुलकर्णी यांची राष्ट्रीय सहसंयोजक पदी



निवड झाल्याने बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे.विवेक कुलकर्णी यांच्या रूपाने अहिल्यानगरला बहुमान मिळाला आहे.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष अँड. जय भोसले यांनी केले आहे.

अखिल भारतीय बजरंग दलाच्या राष्ट्रीयसह संयोजक पदी विवेक कुलकर्णी यांची निवड झाल्याबद्दल विश्व हिंदू परिषदेच्या माजी पदाधिकाऱ्यांचे हस्ते अहिल्यानगर येथे सत्कार करण्यात आला.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष अँड. जय भोसले,माजी प्रांत धर्म प्रसार सहप्रमुख मिलिंद मोभारकर, मा.प्रांत सेवा सहप्रमुख डॉ.प्रदीप उगले, माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे,मठ मंदिर समितीचे माजी अध्यक्ष हरिभाऊ डोळसे,माजी जिल्हा सहमंत्री मुकुल गंधे,बजरंग दलाचे माजी संयोजक कुणाल भंडारी माजी आदी उपस्थित होते.

# नेवासा तालुक्यात रोटाव्हेटर अंगावर पडल्याने कृषी पदवीधर तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

रोटाव्हेटरद्वारे शेतात मशागत सुरु असताना रोटाव्हेटरमध्ये अडकलेले गवत काढत असताना रोटाव्हेटर अंगावर पडून कृषी पदवीधर शेतकरी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नेवासा तालुक्यातील पुनतगाव येथे घडली. पुनतगाव येथील युवराज दिलीप वाकचौरे (वय-२६) हा काल सोमवार दि २१ डिसेंबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास शेतात ट्रॅक्टरच्या साहाय्याने रोटावेटर मारण्याचे काम चालू असताना रोटावेटर मधील गवत व माती काढत असताना रोटावेटर अचानक अंगावर पडून जागीच मृत्यू झाला.

# दुर्गादेवी विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस साजरा

## सूत्र व सिद्धांत बरोबर असतील तर गणित सोपे : बाळासाहेब निवडुंगे

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

आपले पाढे, सूत्र, सिद्धांत, प्रमेय पाठ असतील तर आपणास गणित हा विषय सोपा जातो असे प्रतिपादन जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे खजिनदार बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ढवळपुरी येथे राष्ट्रीय गणित दिवस मोठ्या उत्साहात साजरा कारण्यात आला त्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले गणित विषयाची भीती घालवण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने हा राष्ट्रीय गणित दिवस संपूर्ण भरातभर मोठया उत्साहात साजरा केला जातो. अध्यक्ष स्थानी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख हे होते. थोर भारतीय गणितज्ञ





श्रीनिवास रामानुजन यांचा 22 डिसेंबर हा जन्मदिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या भौमितिक आकृत्यांच्या रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या तसेच गणिताचे काही मॉडेल्स आणि चार्ट विद्यार्थांनी तयार केले. या दिवसाच्या अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाने घेतलेल्या 9 वी संबोध स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत कु. श्रेया गावडे हिने 81 गुण मिळवून केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल तिला आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्राचे वाटप प्राचार्य आदम शेख व पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कु श्रेया गावडे, भक्ती चौधरी, उदयनराज दरेकर, वेदांत भोंडवे, सुजित थोरात या विदयार्थ्यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवनपट उलगडाला.

प्राचार्य आदम शेख म्हणाले की माणसाला सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत गणिताची गरज भासते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष व्यवहारे सर, वर्षा शेळके मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# आई वडील व शिक्षकांप्रती सदैव कृतज्ञता बाळगा : रमाकांत कुलकर्णी

## मिरजगाव येथील भारत विद्यालयाचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गायन, कला, चित्रकला, क्रीडा, शेती, उद्योग व व्यवसाय कोणत्याही क्षेत्राला कमी लेखू नका.आपल्याला जे क्षेत्र आवडते त्या क्षेत्रात नेपुण्य मिळवून यश संपादन करावे. प्रत्येकाने जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकपणाने काम करावे.

नेहमी दुसऱ्यासाठी काम करण्यातच खरा आनंद आहे. चुका सुधारून पुन्हा चुका होऊ नये यासाठी प्रयत्न करणे,चांगल्या सवयीचा अंगीकार करा.आई-वडिल व शिक्षकांशी प्रती नेहमी कृतज्ञता बाळगावी.असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक रमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.



मिरजगाव येथील हिंद सेवा मंडळाचे भारत विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. भारती विद्यापीठाच्या गणिताच्या परीक्षेत राज्यात दुसरी आल्या बद्दल पूर्वा वायाळ या विद्यार्थिनीचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष शरद गोखले हे होते. तर प्रमुख उपस्थितीत पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक रमाकांत कुलकर्णी,सौ.कुलकर्णी,हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष तथा भारत विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,कार्यकारणी सदस्या प्रा. सौ.ज्योती कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल, मुख्याध्यापक किशोर खुरंगे,सेवक प्रतिनिधी गिरीश पाखरे,सहाय्यक सचिव योगेश देशमुख,सारडा महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी,शालेय समिती सदस्य सदाभाऊ शिंदे,उद्योजक संजय बगाडे,सुनील कटारिया,पप्पूशेठ कोठारी,आदिनाथ खिळे,राजेंद्र गोरे,विकास कटारिया,माजी शिक्षक देविदास राऊत, हिंद सेवा मंडळाचे प्रा.शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, माजी मुख्याध्यापक विलास साठे,भाई सथ्था रात्र प्रशालेचे गोरडे सर,शिक्षक प्रतिनिधी विनोद देसाई,शिक्षिका प्रतिनिधी सौ.सुजाता खामकर, शिक्षकेतर प्रतिनिधी बाळासाहेब कुलकर्णी,विद्यार्थी प्रतिनिधी चि.चक्रधर पुराणे,कु. श्रध्दा बावडकर आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगर 'एसबीआय'च्या मुख्य शाखेत ३.७७ कोटींचा अपहार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) मुख्य शाखा, अहिल्यानगर येथे तब्बल ३ कोटी ७७ लाख १ हजार ६१९ रूपयांच्या अपहाराचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, बँकेतीलच सिनियर असोसिएटने आपल्या पदाचा गैरवापर करत ही आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून बँकिंग क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी एसबीआय मुख्य शाखेच्या शाखा प्रमुख भूमिजा साकेत रावत (वय- ४३, मुळ रा. देहराडून, उत्तराखंड, हल्ली रा. सोलापूर रस्ता, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

# प्रवरा माध्यमिक विद्यालयात शालेय विज्ञान-गणित प्रदर्शन





**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील प्रवरा माध्यमिक विद्यालयामध्ये नुकतेच शालेय अंतर्गत विज्ञान- गणित प्रदर्शन संपन्न झाले.५३ वे तालुकास्तरीय विज्ञान- गणित प्रदर्शन दि. २२ डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत शहरातील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाथर्डी येथे होत असून त्याचीच एक पूर्वतयारी म्हणून प्रवरा माध्यमिक विद्यालय भुतेटाकळी येथे शाळेअंतर्गत विज्ञान गणित प्रदर्शनाचे आयोजन दिनांक २० डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन नवनीत मार्गदर्शक पाथर्डी विभागाचे प्रमुख गोरक्ष औटी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी त्यांनी प्रत्यक्ष सर्व विद्यार्थ्यांचे उपकरणे पाहून माहिती घेतली. मुलांचे खूप कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे विज्ञान- गणित विषय शिक्षक श्री अशोक भगत यांनी प्रदर्शनाचे नियोजन उत्कृष्ठ केले. याप्रसंगी पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी केले.

यावेळी विद्यालयातील सहशिक्षक टाकळकर आजिनाथ, गोडगे बंडोपंत, फुंदे बाळासाहेब, खुडे लक्ष्मण, सांबरे धनंजय, फुंदे रामकिसन, खेडकर अशोक, फुंदे वाल्मीक, शिवाजी फुंदे,दीपक फुंदे आदी उपस्थित होते.



# अस्मिता खेलो इंडिया स्पर्धेमध्ये मुलींनी बाजी मारली

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अस्मिता खेलो इंडिया स्पर्धा मध्ये अहिल्यानगरच्या मुलींनी बाजी मारली असून यामध्ये आर्या नागरगोजे, सुवर्णपदक, स्नेहा बुलाखे सुवर्णपदक, सोनाक्षी सिंग सुवर्णपदक,सायली सुरे सुवर्णपदक,युविष्का चव्हाण सुवर्णपदक, श्रेया गाडे रोपे पदक,आर्वी तोमर रोप्य पदक पटकावले व नगरचे नाव उंचावले. पुणे येथे नेताजी सुभाष चंद्र बोस मिलिटरी स्कूल या ठिकाणी नुकत्याच पार पाडल्या या स्पर्धेमध्ये ४०० पेक्षा जास्त मुलींनी सहभाग नोंदविला या स्पर्धेमध्ये अहिल्यानगरच्या मुलींनी टायकोदो मध्ये बाजी मारली आहे.या सर्व विद्यार्थिनींचे महाराष्ट्र किक बॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार सर तसेच अहिल्यानगर किक बॉक्सिंगचे अध्यक्ष नितीन शेलार सर व अहिल्यानगर किक बॉक्सिंगचे कार्याध्यक्ष सचिन मकासरे सर,सचिव श्री गणेश कुसाळकर सर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जामखेडमध्ये भव्य 'आक्रोश मोर्चा'

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

अतिवृष्टीमुळे झालेली पिकांची मोठ्या प्रमाणावर हानी, पीक विम्याचा रखडलेला प्रश्न आणि शेतमालाला मिळणारा अपुरा दर यामुळे बळीराजा गंभीर संकटात सापडला आहे. मात्र, सत्ताधारी सरकार शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ निवडणुकीच्या राजकारणात मशगूल असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने जामखेड येथे भव्य 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला.

या मोर्चामध्ये जामखेड तालुक्यातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सत्तेच्या राजकारणात गुंतलेल्या सरकारला शेतकऱ्यांची विदारक अवस्था लक्षात आणून देण्यासाठी हा एल्गार पुकारण्यात





आला. मोर्चानंतर आंदोलकांनी प्रशासनाला विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना कोणतीही अट न घालता तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्यावी, तसेच पीक विम्याची प्रलंबित रक्कम विनाविलंब शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, ही प्रमुख मागणी करण्यात आली. यासोबतच बियाणे, खते व औषधांच्या वाढत्या किमतींवर सरकारने तातडीने नियंत्रण आणावे, अशीही मागणी यावेळी जोर धरत होती. अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या दर्जावर परिणाम झाला असला तरी कोणत्याही

### 'हे जाहिरातबाज सरकार शेतकऱ्यांचे शत्रू' - आ. रोहित पवार

"अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे, पण सरकारला फक्त निवडणूक इव्हेंट्स करण्यात रस आहे. कर्जत-जामखेडसह संपूर्ण राज्यातील शेतकरी हवालदिल असताना सरकार जाहिरातींवर कोट्यवधी रुपये उधळत आहे. विमा कंपन्यांची मग्रुरी आणि बँकांची वसुली यामुळे बळीराजा होरपळून निघतोय. सोयाबीनला योग्य भाव मिळत नाही आणि हक्काचा पीक विमा मिळेनासा झालाय. सरकारने तातडीने सरसकट नुकसान भरपाई व कर्जमाफीचा निर्णय घेतला नाही, तर हा जनआक्रोश मंत्रालयाला धडकल्याशिवाय राहणार नाही. पंचनाम्यांचे सोपस्कार बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत जमा करावी, अन्यथा गाठ आमच्याशी आहे!"

जाचक अटी न लावता सोयाबीनची हमीभावाने खरेदी करावी, तसेच उडीद व तूर पिकांची खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया राबवावी, अशी स्पष्ट मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक लुटीबाबत आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेतली. खरेदी केंद्रांवर शासनाच्या नियमांनुसारच हमाली व इतर शुल्क आकारले जावे आणि कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.

रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर पिकांना पाणी देण्यासाठी पूर्ण दाबाने वीजपुरवठा करावा, तसेच अतिवृष्टीमुळे बुजलेल्या विहिरी व खरडून गेलेल्या जमिनींच्या दुरुस्तीसाठी तातडीने अनुदान द्यावे, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय, शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणारी शासकीय मदत बँकांनी परस्पर कर्ज खात्यात वळवू नये, असे स्पष्ट आदेश बँकांना द्यावेत आणि सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, या मागणीवर आंदोलक ठाम होते.

कर्जत तालुक्यातही परिस्थिती तितकीच गंभीर असून शासनाने जामखेड व कर्जत या दोन्ही तालुक्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. मागण्या वेळेत मान्य न झाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

# विकासाच्या कामांचा झंझावात : वाळकी गटाची स्वतंत्र ओळख

## खासदार नीलेश लंके यांची तुफान फटकेबाजी



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद वाळकी गटामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे मार्गी लावत गटाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात आली असून, विकासाच्या जोरावर हा गट 'एक नंबर' ठरला आहे, असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.

वडगाव तांदळी येथे ५२ लाख रुपये खर्चातून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या नवीन खोल्या व अंगणवाडी इमारतींच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी खासदार लंके बोलत होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार लंके म्हणाले, ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था सक्षम करण्यासाठी शाळांच्या भौतिक सुविधा वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासन स्तरावरून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

वाळकी गटामध्ये रस्ते, पाणीपुरवठा, शाळा खोल्या, समाजमंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, नदी खोलीकरण, अंगणवाडी व आरोग्य सुविधा यांसारखी अनेक विकास कामे बाळासाहेब हराळ यांच्या पुढाकारातून मार्गी लागली आहेत. या कामांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होत असल्याचे लंके यांनी नमूद केले.

यावेळी बाळासाहेब हराळ म्हणाले, वाळकी गटात महाविकास आघाडीच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कामांचे उद्घाटन विरोधक करत असून, दुसऱ्याच्या कामाचे श्रेय लाटण्याचा हा डाव नागरिकांनी ओळखला आहे. जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम विरोधक करत आहेत. शिक्षण, आरोग्य व मूलभूत सुविधा या क्षेत्रात प्राधान्य देत गटाचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रताप शेळके म्हणाले, जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना जिल्ह्यातील शाळा खोल्या मंजूर करण्यात आल्या. विकासाचा ठोस मुद्दा नसल्यामुळे विरोधक दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

या लोकार्पण कार्यक्रमास कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक रमेश ठोंबरे, गणेश पिंपळे, शहाजी रणसिंग, सतिष ठोंबरे, उपसरपंच रामदास ठोंबरे, रणजित रणसिंग, जालिंदर पिंपळे, रामदास पिंपळे, अमर रणसिंग, रमेश दळवी, राजेंद्र ठोंबरे, मोसीम शेख, राहुल गलांडे, संभाजी पिंपळे, पोपट पिंपळे, कानिफ पिंपळे, सचिन घोंगडे, नवनाथ पिंपळे, संतोष पिंपळे, योगेश घिगे, हनुमंत घालमे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



दिनांक १९ डिसेंबर २०२५, शुक्रवार रोजी सारोळा सोमवंशी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे शिबिर मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटल संचलित रुबी हॉल क्लिनिक, प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव पिसा, निंबवी ग्रामपंचायत व सारोळा सोमवंशी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले.

या शिबिरामध्ये नागरिकांची सामान्य आरोग्य तपासणी, रक्तदाब तपासणी, दंतरोग तपासणी तसेच NCD (Non-Communicable Diseases) स्क्रिनिंग करण्यात आली. रुबी हॉल क्लिनिकच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांना मोफत तपासणी व वैद्यकीय सल्ला देण्यात आला. रुग्णांना आवश्यक ती मोफत औषधे वितरित करण्यात आली. तसेच आयुष्मान भारत कार्ड व वय वंदना कार्ड मोफत काढून देण्यात आली.


यावेळी डॉ. गौरव शिंदे (फॅमिली फिजिशियन) यांनी ॲनिमिया (रक्तक्षय) या आजाराविषयी जनजागृती केली. डॉ. विशाल पानशेंडीकर (जनरल सर्जन) यांनी पोटाचे व इतर विकार याबाबत मार्गदर्शन केले, तर डॉ. भाग्यश्री पानशेंडीकर यांनी महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच डॉ. दीप्ती पवार (दंतरोग तज्ज्ञ) यांनी दंतआरोग्य तपासणी व सल्ला दिला.

या उपक्रमात हॉस्पिटलचे युनिट हेड मायकेल पॉल सर, डॉ. चैतन्य, तसेच इतर वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले. प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव पिसा व निंबवी येथील वैद्यकीय अधिकारी व आरोग्यसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

या आरोग्य शिबिराचा १०० पेक्षा अधिक नागरिकांनी लाभ घेतला. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# दिया छाजेड व इशिका अडसूळ यांनी केलेल्या जागतिक विक्रमाबद्दल शरद पवार यांच्याकडून कौतुकाची थाप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



रोबोटिक्स चॅम्पियनशिपवर भारताचा झेंडा उत्तर युरोपातील एस्टोनियात ७० देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागे टाकत जगात प्रथम क्रमांक पटकविला. याबद्दल माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दिया छाजेड व इशिका अडसूळ यांच्या जागतिक विक्रमाबद्दल कौतुकाची थाप दिली.

उत्तर युरोप खंडातील एस्टोनिया देशात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत यावर्षी अहिल्यानगरच्या दिया प्रीतम छाजेड व इशिका अभिजीत अडसूळ या दोन भारतीय विद्यार्थिनींनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. जगातील ७० प्रगत देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोघींनीही सर्व फेऱ्या यशस्वीरीत्या पार करत प्रथम क्रमांक पटकावून जगात 'नंबर वन' होण्याचा मान मिळवला आहे. याबद्दल मला अभिमान वाटतो असे श्री. पवार म्हणाले.

श्री.पवार यांनी केलेल्या कौतुकाने आम्ही भारावून गेलो असे दिया व ईशा यांनी सांगितले.

# प्रा. प्रशांत इंगोले यांना पीएच. डी

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मानव संसाधन व्यवस्थापन इंग्रजी विषयात प्रा.प्रशांत प्रदिप इंगोले यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी रिचर्ड पॉवर्स व कीम स्टॅन्ली रॉबिन्सन यांच्या निवडक कादंबऱ्या मधील पर्यावरण शास्त्र आणि मानवी अस्तित्व, "या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना हरीभाई व्ही.देसाई महाविद्यालयाचे प्रा.डॉ. महावीर सांकला यांनी मार्गदर्शन केले. वाघिरे महाविद्यालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या इंग्रजी संशोधन केंद्रातून पीएच.डी प्राप्त करणारा हा द्वितीय क्रमांकाचा संशोधन विद्यार्थी आहे.

# वसमत बस स्थानकाच्या बांधकामाला अभियंत्यांची कीड!

**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**



वसमत येथील एस.टी. बस स्थानकाच्या पुनर्बांधकामात पोटगुत्तेदारी सुरू असून निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याबाबत सातत्याने विविध वर्तमानपत्रांत बातम्या प्रसिद्ध होत होत्या. वाळूऐवजी चक्क डस्टचा वापर करून बांधकाम केल्याचे आरोपही वारंवार झाले होते. या गंभीर बाबींची सखोल व कायदेशीर माहिती मिळावी तसेच वसमत बस स्थानकाचे काम पारदर्शक पद्धतीने व्हावे, यासाठी विभागीय अभियंता, व्यवस्थापकीय संचालक ते थेट मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत असंख्य तक्रारी देण्यात आल्या होत्या. मात्र त्यानंतरही काम सुरूच राहिल्याने संशय अधिकच बळावला होता.

या पार्श्वभूमीवर वसमत येथील माहिती अधिकार कार्यकर्ते मुनिरोदिन फारुकी यांनी माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती मागवली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आता उघड झाले आहे. मागवलेल्या माहितीतून स्पष्ट झाले की, मजुरांचा विमा तसेच कामाचा इन्शुरन्स हा करार करतेवेळी कंत्राटदाराने सादर करणे बंधनकारक असताना, मजुरांचा विमा सादर न करता थेट काम सुरू करण्यात आले. इतकेच नव्हे तर बस स्थानकाच्या बांधकामाचा विमा कालबाह्य झाल्याचा संशयही या माहितीतून निर्माण झाला आहे. जर विम्याशिवाय काम सुरू असेल, तर अपघात अथवा नुकसानीची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या संपूर्ण कामात आणखी धक्कादायक बाब म्हणजे कंत्राटदार ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूरचा असून पोटगुत्तेदार, कार्यकारी अभियंता आणि थर्ड पार्टी गुणवत्ता चाचणी संस्था देखील लातूरचीच आहे. म्हणजे वसमत बस स्थानकाच्या कामात सर्वत्र 'लातूर पॅटर्न' राबवला जात असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. पत्रकारांनी यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या बातम्यांनुसार फरशीखाली भर म्हणून वापरण्यात आलेल्या साहित्यामध्ये डस्टचा वापर करण्यात आला, मात्र गुणवत्ता अहवालांमध्ये वाळू वापरल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावरून थर्ड पार्टी संस्थेने प्रत्यक्ष स्थळी येऊन तपासणीच केली नाही का, असा गंभीर संशय निर्माण झाला असून लातूरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने केवळ कागदोपत्रीच गुणवत्ता अहवाल तयार केल्याचा आरोप पुढे येत आहे. गरिबांचे विमानतळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एस.टी. बस स्थानकाला या 'लातूर पॅटर्न' मुळे कीड लागल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाने त्रिस्तरीय समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकारी व अभियंत्यांवर कठोर कारवाई करावी, संबंधित कंत्राटदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकावे तसेच प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

# भीमाशंकरचा एफ.आर.पी.नुसार रु. ३,२७३/- प्रती मे.टन दर

**(समर्थ गांवकरी)**



दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु, येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये गाळप होणा-या ऊसासाठी एफ.आर.पी. रक्कम रु. ३२७२.१४ येत असून त्यानुसार रु. ३२७३/- प्रती मे.टन दर देण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या दोन पंधरवड्याकरीता अदा केलेला प्रथम हप्ता रु. ३१००/- प्रती मे.टन वजा जाता उर्वरित रु. १७३/- प्रती मे.टनाप्रमाणे रक्कम रु. ३ कोटी ६७ लाख ७७ हजार शेतक-यांच्या बँक खात्यावर बुधवार (दि. २४ डिसेंबर) रोजी वर्ग करणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना बाळासाहेब बेंडे म्हणाले की, मा. उच्च न्यायालय व शासनाचे निर्णयानुसार मागील हंगामाचा साखर उतारा गृहीत धरून मागील हंगामाचा ऊस तोडणी वाहतूक खर्च वजा करावयाचा आहे. त्यानुसार गाळप हंगाम २०२५-२६ करीता देय एफ.आर.पी. रु.३२७२.१४ प्रती मे.टन येत आहे. कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये दि. ३० नोव्हेंबर अखेर गाळप केलेल्या ऊसास प्रथम हप्ता रु. ३१००/- प्रती मे. टनाप्रमाणे अदा केलेला आहे. प्रथम हप्ता अदा करतेवेळी रक्कम उपलब्धतेनुसार एफ.आर.पी.ची उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल असे जाहीर केले होते. त्यानुसार इथेनॉल विक्री, इथेनॉल व्याज परतावा व आयकर परताव्याची रक्कम जमा झाल्याने एफ.आर.पी.चे उर्वरित पेमेंटसाठी रक्कम उपलब्ध झाली आहे.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये दि. ३० नोव्हेंबर अखेर २ लाख १२ हजार ५८६ मे.टन ऊस गाळप झाले असून रु. १७३/- प्रती मे. टनाप्रमाणे रक्कम रु. ३ कोटी ६७ लाख ७७ हजार ऊस उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यावर बुधवार (दि. २४ डिसेंबर) रोजी वर्ग करणार असून यापुढे होणारे पंधरवडा ऊस पेमेंट रु. ३२७३/- प्रती मे.टन प्रमाणे वर्ग करण्यात येणार आहे. कारखान्याने आत्तापर्यंत कार्यक्षेत्र व परिसरातील ऊस उत्पादक शेतक-यांना नेहमीच वेळेमध्ये चांगला दर दिलेला आहे. तरी उस उत्पादक शेतक-यांनी आपला उत्पादित केलेला ऊस भीमाशंकर कारखान्यास गाळपास देवून सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी केले.

# रस्ता बनला मृत्यूचा सापळा

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

शेडगाव फाटा ते टाकळी कडेवळी या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून हा रस्ता सध्या नागरिकांसह ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना समोरून येणाऱ्या वाहनांना साईड देताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अरुंद रस्ता व खड्ड्यांमुळे अनेक वेळा उसाचे ट्रेलर पलटी होण्याच्या घटना घडल्या असून मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, सदर रस्त्याचे अवघ्या एक वर्षापूर्वीच नूतनीकरण करण्यात आले होते.

# ठाणे महापालिकेच्या ९ प्रभाग समितीनिहाय एकूण १०६९ नामनिर्देशनपत्रांचे वाटप

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**





ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी आजपासून नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यास सुरूवात झाली. ठाणे महापालिकेच्या 9 प्रभागसमितीतून एकूण 1069 नामनिर्देशन पत्राचे वाटप उमेदवारांना करण्यात आले.

माजिवडा मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्रमांक 1,2,3,8 साठी एकूण 157 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले.

वर्तकनगर प्रभागसमिती अंतर्गत 4,5,7 या प्रभागांसाठी एकूण 103 अर्ज, लोकमान्यनगर सावरकर प्रभागसमितीअंतर्गत 6, 13,14,15 या प्रभागांसाठी 177 अर्ज, वागळे प्रभागसमिती अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक 16,17,18 साठी एकूण 102 अर्ज, नौपाडा कोपरी प्रभाग समिती अंतर्गत 19,20,21,22 साठी एकूण 113 अर्ज, उथळसर प्रभाग समिती अंतर्गत 10,11,12 या प्रभागांसाठी एकूण 101 अर्ज, कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र 9,23,24,25 या प्रभागांसाठी 121 अर्ज, मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत तर 26, 31 या प्रभागासाठी 35, तर 30,32 या प्रभागांसाठी एकूण 36 अर्ज तर दिवा प्रभाग समिती अंतर्गत 27, 28 या प्रभागांसाठी एकूण 78 तर 29,33 प्रभागांसाठी 46 अर्जाचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती प्रभाग समितीनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

# नगर तालुक्यात युवकाला मारहाण

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील जेऊर बायजाबाई शिवारात शेतात कचरा व सांडपाणी टाकण्याच्या वादातून दोन गटात मोठा राडा झाला. १५ ते २० जणांच्या टोळक्याने लोखंडी गज, काठ्या व दगडाने केलेल्या मारहाणीत युवक जखमी झाला. या घटनेमुळे तणाव निर्माण झाला होता. एमआयडीसी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादींवरून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या प्रकरणात, भागवत मोहनकुमार मगर (वय-२४) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते शेतात काम करत असताना एका महिलेने त्यांच्या शेतात कचरा टाकला. याबाबत त्यांनी घरातील मोठ्या व्यक्तींशी बोलण्याचे सांगितले असता, त्या रागातून ११ जणांसह इतर पाच ते १० अनोळखींनी एकत्र येत लोखंडी गज, दगड व काठ्यांनी आपल्यावर हल्ला केला. मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मन्नु अलिम कुरेशी, सत्तार (मुडा) इस्माईल शेख, मुन्नीर खैरू शेख, इन्नु अलिम शेख, जिलानी नजिम शेख, सकलेम सत्तार शेख, कादिर अब्दुल शेख, सलिम अकबर शेख, इदरीस मुन्नीर शेख, दस्तगीर करीम शेख आणि वाहपरशिद पठाण यांच्यासह अनोळखी पाच ते १० (सर्व रा. जेऊर बायजाबाई) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याच घटनेच्या संदर्भात दुसरी फिर्याद एका ६० वर्षीय वृध्द महिलेकडून दाखल करण्यात आली आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, शनिवारी (२० डिसेंबर) सकाळी घराची साफसफाई करत असताना कचरा चुकून रस्त्यावर पडला. त्यामुळे तो कचरा तिने जवळील कंपाऊंडच्या पलीकडे टाकला.

# ग्रामीण भागातील कन्येची शैक्षणिक शिखराकडे झेप

## प्राजक्ता शंकर आरोटे-जाधव यांना GLS विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील ग्रामीण पार्श्वभूमीतील संशोधक सौ. प्राजक्ता शंकर आरोटे-जाधव यांना गुजरातमधील 1927 साली स्थापन झालेल्या, राज्यातील सर्वांत जुन्या व मोठ्या शिक्षणसंस्थांपैकी एक असलेल्या GLS University, अहमदाबाद कडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्या शंकर भागा आरोटे यांच्या कन्या आहेत.

त्यांच्या संशोधन प्रबंधामध्ये भारत–आसियान मुक्त व्यापार करार (FTA) मधील समस्या व आव्हाने, तसेच भारत–आसियान (ASEAN) व्यापार अधिक कसा वाढवता येईल, यावर सखोल अभ्यास करण्यात आला आहे. विशेषतः नॉन-टॅरिफ बॅरिअर्स (NTBs) कमी करण्यासाठी त्यांनी प्रभावी धोरणात्मक उपाय सुचवले आहेत. कृषी वस्तूंच्या भारत–आसियान व्यापारवृद्धीवर त्यांनी केलेले संशोधन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असून, यामुळे उत्पादनांना विस्तृत बाजारपेठ, चांगले दर आणि निर्यात संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यांच्या अभ्यासातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे अनेक ठोस धोरणात्मक मुद्दे पुढे आले आहेत. हे संपूर्ण संशोधन प्रख्यात संशोधक व मार्गदर्शक डॉ. हास्तीमल सागरा यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. विशेष बाब म्हणजे, ही पदवी त्यांना भारताचा प्रसिद्ध क्रिकेटपटू व टी-२० भारतीय संघाचा कर्णधार Suryakumar Yadav यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली—हा क्षण त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अत्यंत गौरवशाली ठरला. ग्रामीण कुटुंबातील असूनही सौ. प्राजक्ता आरोटे-जाधव यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांनी Savitribai Phule Pune University मधून इंग्रजी साहित्य आणि अर्थशास्त्र या दोन वेगवेगळ्या विषयांत प्रथम श्रेणीसह पदव्युत्तर पदव्या संपादन केल्या आहेत.

त्यांनी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर २० हून अधिक संशोधन निबंध सादर केले असून, त्यापैकी चार निबंधांना उत्कृष्ट संशोधन पुरस्कार मिळाले आहेत. नामांकित नियतकालिकांत त्यांच्या अनेक संशोधन लेखांचे प्रकाशन झाले आहे. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागासाठी त्यांनी परदेश प्रवास केला असून, United Nationsच्या विशेष अभ्यासक्रमांचे प्रशिक्षणही त्यांनी पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, गर्भावस्थेदरम्यानच त्यांनी पदव्युत्तर शिक्षण आणि पीएच.डी. पूर्ण केली—जिद्द, चिकाटी आणि शिक्षणावरील निष्ठेचे हे विलक्षण उदाहरण आहे.

आजच्या बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीत, अमेरिकेकडून आयात वस्तूंवर वाढीव शुल्क आकारले जात असताना आणि भारताचा आसियान देशांबरोबरचा व्यापार तुटीचा असताना, भारत–आसियान व्यापार वाढवण्यासाठी प्रभावी वाटाघाटी, व्यापार सुलभीकरण आणि नॉन-टॅरिफ अडथळे कमी करण्याचे उपाय त्यांच्या संशोधनातून ठोसपणे समोर आले आहेत. सौ. प्राजक्ता शंकर आरोटे-जाधव यांचे हे यश त्यांच्या कुटुंबासाठी, गावासाठी आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद असून, ग्रामीण भागातील विशेषतः महिला विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# कोकण व नाशिक विभाग अध्यक्षपदी प्रा. सुनील जोपळे

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवणारी, शोषित-वंचितांच्या न्यायासाठी लढणारी ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल (OFROT) या प्रभावी संघटनेला नेतृत्वाची नवी दिशा मिळाली असून, आदिवासी समाजाचे अभ्यासू नेतृत्व, सामाजिक कार्यकर्ता व प्राध्यापक प्रा. सुनील जोपळे यांची OFROT संघटनेच्या कोकण प्रांत तसेच नाशिक विभाग अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



ही निवड OFROT संघटनेचे राज्य अध्यक्ष प्राचार्य तथा ॲडव्होकेट राजेंद्रजी मरसकोल्हे यांनी कोकण विभाग दौऱ्यावर असताना, कोकण विभागातील OFROT च्या विविध जिल्हा शाखांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत अधिकृतपणे जाहीर केली. या घोषणेमुळे संपूर्ण कोकण व नाशिक विभागात आदिवासी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.या महत्वपूर्ण बैठकीला OFROT रायगड जिल्हा शाखेचे अध्यक्ष विष्णू साबळे, श्रीकृष्ण सुपे, रत्नागिरी जिल्ह्याचे कार्याध्यक्ष लुकमान तडवी, गणेश सरयाम, आकाश माळेकर, सांगली येथून गजानन डाखोरे, घोरपडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राज्य अध्यक्ष राजेंद्र मरसकोल्हे यांनी सांगितले की,

"आदिवासी समाजावर होणारे अन्याय, प्रशासनातील दुर्लक्ष, हक्कांची पायमल्ली थांबवण्यासाठी संघटना अधिक मजबूत करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक जिल्हा शाखेने सभासद संख्या वाढवून संघटनेचा प्रचार व प्रसार प्रभावीपणे करावा,"असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. सुनील जोपळे यांची निवड ही केवळ पदाची नाही, तर आदिवासी समाजाच्या संघर्षाला मिळालेली नैतिक ताकद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. जोपळे यांनी आजवर शिक्षण, कायदेविषयक मार्गदर्शन, आदिवासी प्रश्नांवरील अभ्यासपूर्ण मांडणी आणि थेट सामाजिक चळवळींतून समाजासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

निवडीच्या निमित्ताने उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रा. सुनील जोपळे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला व पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :-** रंगला निवडणुकीचा गप्पांचा फड- जेष्ठ नेते भानुदास कोतकर यांचा सध्या केडगाव मध्ये संवाद दौरा चालू असून आज त्यांनी प्रभाग १६ मध्ये गाठी भेटी घेतल्या. यावेळी जुन्या आठवणी व चर्चाचा गप्पाचा फड रंगला यावेळी उमेदवार सागर सातपुते, भूषण गुंड, सविता कराळे, लता बोरगे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...




### बरबडा येथे शिंदे शिवसेनेच्या वतीने बॅलेकेट व चटई वाटप

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा येथील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे यांच्या डोळस संकल्पनेतून बरबडा येथील ज्या समाजात आपन जन्मलो त्या जन्मात काहीतरी देणे लागतो या डोळस संकल्पनेतून शालेय साहित्य वही पेन कंपास पेटी आज बॅलेकेट व चटई थंडिच्या काळात गोरगरिबांच्या सुखा : दुःखात सहभागी होत या उदार अंतकरणाने काहितरी देण्या लागतो भावनेने बरबडा येथील दलितांच्या वस्तीमध्ये साहित्य वाटप करण्यात आले आहे गंगाधर बडूरे यांच्या संकल्पनेतुन बरबडा सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप केला आहे. त्याची सुरुवात या बरबडा येथील शाळेतून करण्यात आली आहे.आज बॅलेकेट व चटई वाटप करण्यात आले आहे यावेळी शिवप्रसाद बडूरे व सुभम रुपेश शेवाळे यांचे चिरंजीव शेवाळे यांच्या हस्ते सर्व साहित्य वाटप केले आहे त्यावेळ त्याचबरोबर गावातील तरुण प्रतीक जाधव, पवन बडूरे, बालाजी नागधरे, पंटू सुपारे, शंकर पचलिंग, माधव धुमाळे, योगेश पचलिंग, हरी वटपलवाड इत्यादी ची उपस्थिती होती.

### जांभळाच्या तंटामुक्ती अध्यक्ष व उपाध्यक्षची निवड




तामसा (स. गांवकरी) : आज मनाठा पोलीस स्टेशन येथे महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष संभाजी तुकाराम धुमाळे व उपाध्यक्ष मधुकर पोलशेटवार यांच्या निवड करण्यात आली असून मनाठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास सुदामराव चवळी यांनी दोघांना नियुक्ती पत्र देण्यात आलं यावेळी पोलीस उपनिरीक्षक सुदर्शन हिंगोले , सहायक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय गिरी, जांभळा बीट जमादार कृष्णा यादव, अशोक दोड, बालाजी रावळे साहेब, शंकर सोनटक्के साहेब,जांभळा नगरीचे विद्यमान सरपंच पांडुरंग उत्तमराव डवरे उपसरपंच प्रतिनिधी सदाशिव आनंदराव सरकुंडे, ग्रा.प.स. प्रतिनिधी बालाजीराव काशिराव शेटे जांभळेकर धन्याच्या वाडीचे पोलीस पाटील रामराव दत्तराव बोरकर,व ईतर मंडळी उपस्थित होते. जांभळा नवीन महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष संभाजीराव तुकाराम धुमाळे व उपाध्यक्षपदी मधुकर तुकाराम पोलशेटवार नेतृत्वाखालील कार्यकाल यशस्वी होवो, गावातील. महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान हे गावातील लोकांना भांडणापासून व पर्यायाने गुन्ह्यापासून परावृत्त करणे व गावातील तंटा गावातच समोपचाराने मिटावे या उदात्त हेतूने महाराष्ट्र शासनाने सन २००७ पासून सुरु केलेले अभियान. आपण याही पुढे तंटे शांततेत सुटावेत, आणि सर्वांमध्ये सलोखा नवीन तंटामुक्ती अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि सर्व सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आलं.

# भैय्या पवार यांनी जिंकली मानाची कुस्ती

## माळेगाव यात्रेच्या वैभवात वाढ- खासदार रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**


श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा दि २३ डिसेंबर- यात्रेचे वैभव अधिक वाढवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध प्रयत्न करण्यात येत असून, पुढील काळात यात्रेच्या ठिकाणी भौतिक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील, असे प्रतिपादन नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले.



माळेगाव यात्रेनिमित्त पंचायत समिती लोहा यांच्या वतीने वीर नागोजी नाईक मैदानात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धांचे उद्घाटन खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, माजी आ मोहन हंबर्डे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय बेळगे, संजय कऱ्हाळे, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, राजेश पावडे, सुरज शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कुस्ती स्पर्धांच्या बक्षीस रकमेत वाढ करण्यात आल्याचे सांगीतले. वीर नागोजी नाईक मैदानातून अनेक नामांकित कुस्तीगीर घडले असून या मैदानाची परंपरा गौरवशाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

माळेगावच्या कुस्ती मैदानात लोहा तालुक्यातील रामतीर्थ येथील मल्ल भैय्या पाटील पवार आणि राम तेलंग, शिवनगर, जि. परभणी यांच्यात मानाची कुस्ती खेळविण्यात आली. अनेक डावपेचांनी रंगलेल्या या कुस्तीत भैय्या पवार यांनी विजय मिळवला. त्यास ५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. भैय्या पवार यांनी कोल्हापूरच्या मोतीबाग तालमीमध्ये तीन वर्षे दादू मामा चौगुले यांच्याकडून कुस्तीचे धडे घेतले आहेत. त्यांनी परभणी, लातूर, कोल्हापूर, कुरूडवाडी आदी ठिकाणी कुस्ती स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. दररोज व्यायाम, आठसे सूर्यनमस्कार व दीडसे दंड बैठकांचा सराव तसेच बदाम, तूप व फळांचा आहार घेत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# बिबट्याचे अहवाल नागपूर येथुन कधी येणार ?



**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

पारगाव तर्फे आळे येथील पाच ते सहा वर्षाचा रोहित वर बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी झाला आहे . रामवाडीत वन विभागाने पिंजऱ्यात पकडलेला बिबट्याचे स्वॅब ( नमुने) नागपूर येथील फॉरेन्सिक लॅब मध्ये तपासणीसाठी पाठवले आहेत. नागपूर येथून तपासणीचा अहवाल कधी येणार ? आहे. याकडे ग्रामस्थांचे व तालुक्यातील सर्वांचे लक्ष लागले आहे. तपासणी अहवाल आल्यानंतर पकडलेला बिबट्या नरभक्षक आहे की नाही ते स्पष्ट होईल . पिंजऱ्यात पकडलेला बिबट्या नर जातीचा असून सात वर्षाच्या मुलाचा बळी घेतला आहे. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पकडलेल्या बिबट्याला माणिकडोह येथील निवारा केंद्रामध्ये पाठवले आहे. यामुळे येथील नागरिकांमध्ये बिबट्यांची भीती मोठ्या प्रमाणात पसरलेली आहे . नागपूर येथून तपासणीचे आव्हान कधी येणार याकडे नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# भारतातील सर्वात मोठी गोल दगडी भूलभुलैया (चक्रव्यूह) सापडले !

### प्राचीन टेर–रोम व्यापारी संबंधांवर नवे प्रकाशझोत!

### डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील बोरमणी परिसरात भारतातील सर्वात मोठी गोलाकार दगडी भूलभुलैया (चक्रव्यूह) सापडल्याने पुरातत्त्व व इतिहास अभ्यासकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. हा शोध सुमारे २,००० वर्षांपूर्वीच्या प्राचीन व्यापार मार्गांबाबत नवे संदर्भ देणारा मानला जात आहे. विशेषतः टेर (धरशिव) आणि रोम यांच्यातील व्यापारी संबंध अधिक ठळकपणे समोर आले आहेत.

१५ वर्तुळांची अद्वितीय रचना : नुकत्याच समोर आलेल्या या भूलभुलैयामध्ये १५ वर्तुळे असून एकूण आकार सुमारे ५० × ५० फूट आहे. तामिळनाडूतील गेडीमेडू येथे आढळलेल्या ५६ फूट चौरस भूलभुलैयाचे क्षेत्रफळ सर्वात मोठे मानले जाते; मात्र बोरमणीतील ही रचना गोलाकार स्वरूपातील भारतातील सर्वात मोठी असल्याचे अभ्यासक सांगतात.

या भूलभुलैयाचा आराखडा शास्त्रीय (क्लासिकल) कुटुंबातील संरचनांशी साधर्म्य दर्शवतो.



मात्र मध्यभागी असलेला सर्पिल (स्पायरल) घटक भारतीय परंपरेची वेगळी ओळख अधोरेखित करतो. भारतात अशा रचनांना 'चक्रव्यूह' असे संबोधले जाते—ज्यात वास्तूशास्त्रीय कौशल्यासोबतच सांस्कृतिक व प्रतीकात्मक अर्थ दडलेला असतो. अनेक परिपाठांनी (लूप्स) बनलेली ही दगडी रचना, ज्ञात भारतीय दगडी भूलभुलैयांपैकी सर्वात भव्य मानली जात आहे.

### ऐतिहासिक महत्त्व आणि पर्यटनाची संधी

हा शोध भारताच्या प्राचीन इतिहासातील अभियांत्रिकी कौशल्य, स्थानिक नियोजन व सांस्कृतिक प्रथा यांचे ठोस पुरावे देतो. सोलापूर भागाचे ऐतिहासिक महत्त्व वाढवणारा हा ठेवा भविष्यात इतिहासप्रेमी, संशोधक व सांस्कृतिक पर्यटन यांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करू शकतो, असा विश्वास तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

### रोमन व्यापाऱ्यांसाठी मार्गदर्शक?

अभ्यासकांच्या मते, ही भूलभुलैया रोमन व्यापाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे/चिन्हे म्हणून वापरली गेली असण्याची शक्यता आहे. पश्चिम किनाऱ्यावरून महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात व पुढे ईशान्य भारताकडे प्रवास करणारे व्यापारी मसाले, रेशीम यांच्या बदल्यात सोने, वाइन व मौल्यवान दगड व्यवहारात आणत असत.

प्राचीन व्यापार केंद्रांची साखळी : कोल्हापूर, कराड आणि टेर ही केंद्रे प्राचीन काळी परदेशी व्यापारासाठी प्रसिद्ध होती. १९४५ मध्ये ब्रम्हपुरी येथे झालेल्या उत्खननात ग्रीको-रोमन समुद्रदेव पोसिडॉन याचा पुतळा आणि पॉलिश कांस्य आरसा सापडल्याने भूमध्य जगाशी थेट संपर्क सिद्ध झाला होता. सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यांत सापडलेल्या दगडी भूलभुलैयांमुळे हा संपूर्ण प्रदेश ग्रीको-रोमन व्यापाऱ्यांसाठी सक्रिय व गजबजलेला व्यापार मार्ग असल्याचे अधिक बळकट होते—जणू त्या काळातील 'रेशीम मार्गा'चा भारतीय महत्त्वाचा भाग.

लहान दगडी विटांपासून बनवलेल्या या भूलभुलैयाच्या अंगठ्यांमध्ये सुमारे दीड इंच खोल माती साचलेली आढळते. यावरून ही रचना शतकानुशतके अबाधित राहिल्याचे स्पष्ट होते.

# ट्रॅक्टर कर्ज वितरणात खोटे पत्ते दाखवून ४ कोटी ८२ लाखांची फसवणुक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

एल अँड टी फायनान्स कंपनीच्या ट्रॅक्टर कर्ज वितरण प्रकरणी मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी ६५ कर्जदार व ४ सेल्स एक्झीक्युटीव्ह अशा एकुण ६९ जणांवर राहुरी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. एल अँड टी फायनांन्सचे झोनल सेल्स मॅनेजर योगेश छगन सुर्यवंशी रा. पुणे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, एल अँड टी फायनांन्स तर्फे वाहन खरेदी, घर खरेदी, व्यावसायासाठी तसेच इतर गोष्टींसाठी कर्ज पुरविले जाते. कर्ज वितरण करण्याकरीता तसेच चौकशीसाठी हाताखाली सेल्स




एक्झीक्युटीव्ह नेमलेले असतात.

सेल्स एक्झीक्युटीव्ह हे कर्जाची आवश्यकता असणाऱ्या ग्राहकांच्या भेटी घेणे, त्यांच्या कडुन कर्जसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन ते ग्राहक कर्ज देण्याचा लायक आहेत किंवा नाही याबाबत चौकशी करुन त्यांच्या घराचे फोटो घेणे, कर्ज मंजुर झाल्यानंतर त्यांना ट्रॅक्टर डिलर यांचेकडून ट्रॅक्टर वितरीत करणे तसेच कर्जदार यांना टॅक्टर वितरीत केल्यानंतर त्यांच्याकडून कर्जाचा पहिला हप्ता भरुन घेणे असे कामे असतात. आमच्या सेल्स एक्झीक्युटीव्ह यांच्याकडून ऑगस्ट-२०२३ ते नोव्हेंबर-२०२४ रोजी दरम्यान सचिन राजेंद्र जाधव, रा. जातप, पढेगाव ता- श्रीरामपूर, आकाश किशोर ओव्हळ, रा.भानसहिवरा ता-नेवासा, दगडु रंगनाथ शिरताड रा. सावरगाव ता-पारनेर, अक्षय बन्सी तापकिरे रा.मालकूप ता-पारनेर, रंगनाथ कृष्णा भालके रा. वनकुटे ता-पारनेर, सुनिल बापु नळघे रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, सचिन राजेंद्र बर्डे रा. प्रसादनगर तालुका श्रीरामपूर, गणेश बापुसाहेब गोलवड रा. त्रिंबकपूर, ता-राहुरी, पवन अशोक संसारे रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, सुरज दत्तात्रय रा. वाळुंज रा-ढवळगाव ता-पारनेर, अविनाश सुभाष पिंपळे रा. प्रसादनगर ता-श्रीरामपुर, विठ्ठल नारायण जऱ्हाड रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, नितीन बापुसाहेब तांदळे रा. कोल्हार बु ता-राहाता, बाळु भाऊ पवार रा. गाजदीपुर ता-पारनेर, मुजफ्फर मनसुर खान रा. तनपुरेवाडी ता-राहुरी, दीपक सोपान तांबे रा. चिंचपूर बु. ता-संगमनेर, नितीन जाणु भिंगारदिवे रा. प्रवरानगर ता-राहाता, नारायण एकनाथ साळवे रा. वनकट्टे ता-पारनेर, मिरा सारंगधर करंजकर रा. देसवंडी ता- राहुरी, अर्जुन मुकेश गांगुर्डे रा-धोत्रे बु ता-पारनेर, दिलीप गोरख लहुंदे, रा. ताहराबाद ता-राहुरी, राहुल देवराम जाधव रा.वनकुटे ता-पारनेर, सलमान सलिम पठाण रा. खाटीक गल्ली राहुरी ता-राहुरी, विशाल सुनिल बर्डे रा. कोल्हार बु ता-राहाता, सौरभ सुधाकर संसारे रा.देवळाली प्रवरा ता-राहुरी, बळीराम धवाजी मेढे रा. पळशी ता-पारनेर, रघु किसन कोरडे रा. मैंगळवाडी ता- श्रीगोंदा, ज्ञानदेव केवाजी गंडाळ रा. महारकाड पळशी ता-पारनेर, बापुसाहेब जगन्नाथ बर्डे रा.संकरापूर ता-राहुरी, संजय जालिंदर माळी रा.चिंचोली ता-राहुरी, राहुल दगडु येरमाळ रा. तिसगाव ता-राहाता, अजिंक्य जालिंदर जगताप रा.चिंचविहिरे ता-राहुरी, शशिकात रंभाजी माळी रा-कर्जुले हर्या ता-पारनेर, योगेश दत्तात्रय वाघ रा.कजुर्ज हर्या ता-पारनेर, रवींद्र भगवान तमनर रा.गोटुंबे आखारा ता-राहुरी, संदीप पोपट कदम रा. मानोरी ता-राहुरी, अशोक बाळु अमोलिक रा.भोकर ता-श्रीरामपुर, सतीष पांडुरंग पठारे- टाकळीभान, ता-श्रीरामपूर, आप्पा रामदास सोनवणे, रा.मनिषा मेडीकल जवळ, वार्ड नंबर-७ श्रीरामपुर, बाळासाहेब प्रभाकर राठोड रा. लोहगाव ता-राहाता, सतिष उत्तम वाघ रा. माहेगाव ता-श्रीरामपुर, कैलास विश्वनाथ शिंदे रा.दहिगाव ता-अहमदनगर, रुषीकेश कैलास जोशी रा. दत्तनगर ता-श्रीरामपूर, विलास विठ्ठल कदम रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, अर्जुन सोमनाथ मोरे रा.जातप ता-राहुरी, कृष्णकांत उत्तम कदम रा.देवळाली प्रवरा ता-राहुरी, मीनीनाथ बाळासाहेब काळे रा.देवळाली प्रवरा ता-राहुरी, पांडुरंग बाळासाहेब शिंदे रा. जातप ता-राहुरी, शेखर सुभाष जमधडे रा. बेलापूर बु. ता-श्रीरामपूर, रवींद्र सिताराम माळी रा. संक्रापूर ता-राहुरी, गोरख साहेबराव शिरसाट रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, आप्पासाहेब दिगंबर पंडीत रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, गणेश अशोक तुपे रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, अविनाश सुखदेव शेंडगे रा. देवळाली प्रवरा ता-राहुरी, बुधा गंगाराम मेंगाळ रा.पळशी ता-पारनेर, सुभाष बाळू पवार रा. पोखरी ता-पारनेर, बाळू सांडू पवार रा-ढोकी ता-पारनेर, राहुल अशोक भिंगारदिवे रा. करंदी ता-पारनेर, पांडुरंग छबाजी साठे रा. पाडळी कान्हुर ता-पारनेर, धनंजय कांतीलाल गांगुर्डे रा. पाडळी कान्हुर ता-पारनेर, गिरीधर मारुती सोलट रा. हिवरे झरे ता-अहिल्यानगर, दिलीप आनंदा कोतकर रा.राळेगण ता- पारनेर, तुळशीराम लक्ष्मण बर्डे रा.राळेगण ता-पारनेर, किरण भिवा मांढे रा.चिंभळे ता-श्रीगोंदा, संभाजी एकनाथ परे रा.कोल्हार बु. ता-राहाता, या कर्जदारांनी ट्रॅक्टर खरेदी करीता कर्जाची मागणी केली होती. या कर्जदारांची आमचे एल अँड टी फायनांन्समध्ये काम करणाऱ्या सेल्स एक्झीक्युटीव्ह यांनी चौकशी करुन त्यांचे कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन त्यांना ट्रॅक्टर घेण्यासाठी ४ कोटी ३ लाख ४० हजार ४७५ रुपये रक्कम कर्ज म्हणून वितरीत करण्यात आले. त्यातून कर्जदार यांनी ट्रॅक्टर खरेदी केले आहेत.

कर्जदार यांनी टॅक्टर खरेदी केल्यानंतर त्यांनी मुदतीत कर्ज भरणे अपेक्षीत असताना त्यांनी ते मुदतीत भरले नाही. कर्जदार यांच्या खात्यावरुन कर्जाचा हप्ता हा बँकेच्या खात्यातून न आल्यामुळे आमचे फायनांन्स कंपनीचे अधिकृत लोक हे कर्जदार यांच्या घरी जावुन चौकशी केली असता कर्जदार यांनी आमच्या लोकांना उडवाउडवीचे उत्तरे देऊन कर्ज हप्ते भरण्यास नकार दिला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# साई आदर्श मल्टीस्टेटला सहकार पुरस्कार प्राप्त

## संस्थापक अध्यक्ष कपाळे यांनी स्वीकारला पुरस्कार




**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

येथील साई आदर्श मल्टीस्टेट पतसंस्थेला राज्य पातळीवरील जागतिक सहकार वर्षांच्या औचित्याने ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस बँक पुणे यांच्या संयुक्त वतीने दिला जाणारा सहकार पुरस्कार प्राप्त झाला असून संस्थेचे संस्थापक

अध्यक्ष शिवाजीराव कपाळे यांनी हा पुरस्कार नुकताच स्वीकारला आहे . महाराष्ट्रातील संस्थांना त्यांच्या कार्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने हा पुरस्कार दिला गेला यावर्षीच्या पुरस्कारासाठी साई आदर्श मल्टीस्टेट या संस्थेने सादर केलेल्या माहितीच्या आधारे हा पुरस्कार संस्थेला मिळालेला आहे समितीने केलेल्या मूल्यांकनुसार मल्टीस्टेट पतसंस्था विभागामध्ये या पुरस्कारासाठी 200 कोटी ठेवी या गटात प्रथम क्रमांक यासाठी या संस्थेची निवड करण्यात आली महाराष्ट्राचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते सदर पुरस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव कपाळे व संचालक मंडळ यांनी स्वीकारला आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,कॉसमॉस बँकेचे चेअरमन मिलिंद काळे, ग्रीन वर्ल्ड चे गौतम कोतवाल आदी उपस्थित होते.

कपाळे यांनी सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे आम्ही केलेल्या चांगल्या कामाची पावती आहे. संस्थेच्या प्रगती बरोबरच सभासद,ठेवीदार, कर्जदार यांचे हीत जोपासण्याचे काम आम्ही गेली बारा वर्षापासून करत आहोत .त्यासाठी आम्ही अहोरात्र झटून संस्था प्रगतीपथावर नेली आहे. त्यामुळे ठेवीदार ,कर्जदार सभासदांचा विश्वास जपण्यामध्ये आम्ही यशस्वी ठरलेलो आहोत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे यासाठी संचालक मंडळ ,कर्मचारी वृंद, कलेक्शन एजंट ,सभासद, ठेवीदार, खातेदार यांचे मोठे सहकार्य लाभलेले आहे त्यांनी संस्थेवर मोठा विश्वास नेहमी टाकलेला आहे त्यास आम्ही कधीही तडा जाऊ देणार नाही येत्या कालावधीमध्ये 200 कोटींचा पल्ला आम्ही नक्कीच पार करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला हा सन्मान स्वीकारताना संस्थेचे संचालक किशोर थोरात ,डॉ. विलास पाटील अक्षय कपाळे व धीरज कपाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू ठरतेय माळेगाव यात्रा

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा- दि २३ डिसेंबर- दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेली श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा ही केवळ धार्मिक परंपरेपुरती मर्यादित न राहता ग्रामीण भागातील व्यापार, संस्कृती व अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरत आहे. यात्रेच्या निमित्ताने येथे विविध वस्तूंचा भव्य बाजार भरला आहे. या यात्रेत मुरमुरे, कलम, बताशा, गुळ फुटाणे, रेवड्या, चक्की लाडू, टिपरे, जिलबी, खडीसाखरेचे गोळे, साखरेचा हार, सुके पेढे, चुरमुरे, तिळगुळ वडी, गाठीया, लाह्या यासारख्या पारंपरिक खाद्यपदार्थांसह मातीची भांडी, पितळ व स्टीलची भांडी, स्वयंपाकघरातील वापराची भांडी, घागर, हंडे, तांब्या, कढई, पातेले, तसेच नव्या व जुन्या कपड्यांचा मोठा बाजार येथे भरतो. यासोबतच धोतर, शेलापागोटे, उपरणी, साड्या, ओढण्या, चादरी, सतरंज्या, ताडपत्री व प्लास्टिक कापडही मोठ्या प्रमाणावर विक्रीस



उपलब्ध आहेत. माळेगाव यात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे पशुधन व पाळीव प्राण्यांसाठी लागणाऱ्या साहित्याचा स्वतंत्र व मोठा बाजार येथे भरतो. यात बैल, बकरी, घोडे, गाढव तसेच इतर विविध पशुधनांसाठी खोगीर, लगाम, पट्टे, दोर, जीन, नाल, चाबूक, घुंगरू, कासरे, झुली, घुंगरमाळा, घंट्या, साखळ्या, हार, चारा ठेवण्याची भांडी, बांधणीसाठी लागणारे साहित्य, कपाळ गोंडा, शिंगगोंडे, बोरखी यासारखी पारंपरिक व उपयोगी साधने विक्रीस उपलब्ध आहेत. याशिवाय लोककलावंत व शेतकऱ्यांसाठी घोंगडी, रेशीम घोंगडी, काळी व पांढरी घोंगडी, कवड्यांच्या माळा, पायातील चाळ, नक्षीकाम केलेल्या काठ्या, लाकडी काठ्या तसेच विविध हस्तकला व लाकडी वस्तूंचीही विक्री होत आहे. महिलांसाठी सौंदर्य व दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये बांगड्या, कुंकू, हळद, टिकल्या, काजळ, केसांचे क्लिप्स, कंगवे, कंबरबेल्ट, हरमाळ, मंगळसूत्र, पर्स तसेच संसारोपयोगी साहित्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. बाळगोपाळांसाठी विविध प्रकारची खेळणी, सजावटीच्या व शैक्षणिक खेळण्यांचाही या यात्रेत समावेश आहे. या यात्रेत महाराष्ट्रासह परराज्यातील व्यापारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले असून विविध राज्यांतील व्यापाऱ्यांनी येथे दुकाने थाटली आहेत. सर्व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने यात्रेस उपस्थित राहतात.

# राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस जिवन पाटील घोगरे यांना अपहरण करूण जबर मारहाण

**दिवसा ढवळ्या फिल्मी स्टाईलने केले अपहरण आरोपी पोलीसांच्या ताब्यात**

- सिडकोच्या मुख्य रोडवरील घटना नेत्यांचे असे तर सर्व सामान्याचे काय ? कायदा हाय का नाय ?

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



सिडकोच्या ज्ञानेश्वर नगर परिसरात मुख्य रस्त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे नेते प्रदेश सरचिटणीस तथा नांदेड महानगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते जीवन पाटील घोगरे हे ज्ञानेश्वर नगर ते हाडको मुख्य रस्त्याने जात असताना अरोपी यांनी त्यांची गाडी यांच्या गाडी समोर मुख्य रोडवर आडवी लावली व यांच्या गाडीवर दिवसा ढवळ्या आरोपितांनी प्रथम दगडफेक करण्यात आली. यानंतर सात अरोपींनी त्यांना दुसऱ्या गाडीतून डांबुन पळवून फिल्मी स्टाईल ने घेऊन गेले ही घटना दि २२ डिसेंबर रोजी दुपारी १२.४५ च्या सुमारास घडली. या घटनेमुळे सिडको हाडको परिसरासह शहरात खळबळ उडाली असून, राष्ट्रवादीच्या जुन्या आणि नवीन कार्यकर्त्यांमध्ये पदावरून बराच काळापासून वाद सुरू होता, अशी चर्चा आहे. याच वादाचे रूपांतर हाणामारीत व आपहरण पर्यंत झाले असल्याचे समजते 'राष्ट्रवादी चे जिवन पाटील यांना जबर मारहाण करूण पोलीसांच्या गतीशील तपास यंत्रणे मुळे दोन तिन तासात शिताफीने आरोपींना अटक केली आहे ! नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व ज्ञानेश्वर नगर रोड येथील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन त्याची चौकशी केल्यानंतर पोलिसांनी घटनेच्या अवघ्या २ तासांत नेमके काय घडले, हे समोर आणले आहे. जीवन पाटील घोगरे यांचे प्रकरण राजकिय दृष्टीकोणातुन झाल्याचे समजते कारण त्यांच्या गाडीवर प्रथम दगडफेक करण्यात आली. यानंतर घोगरे यांना दुसऱ्या गाडीतून आपहरण करण्यात आले होते या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सिडको हाडको परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे . या घटनेमुळे जीवन घोगरे यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी सह सर्व पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जमा झाले होते. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्या सह सर्वत्र खळबळ उडाली असून, घोगरे यांचे अपहरण झाल्याची बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरली होती, मात्र पोलिसांनी अवघ्या २ ते ३ तासांत या प्रकरणाचा छडा लावला आहे.

# चिमुकलीचा उपचारा दरम्यान मृत्यू

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरातील बेडेकर नगर, दिवा–आगासन रोड परिसरात कुत्रा चावल्याच्या घटनेनंतर उपचार सुरू असतानाच ५ वर्षीय निशा शिंदे या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर असून यामुळे महापालिका प्रशासन व सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना ॲड. रोहिदास मुंडे – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख यांनी सांगितले की, या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी होणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून वस्तुस्थिती समोर येईल. १७ नोव्हेंबर रोजी घराबाहेर खेळत असताना एका पिसाळलेल्या कुत्र्याने चिमुकलीवर हल्ला केला होता. त्यानंतर तिला तातडीने डोंबिवली येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू करून आवश्यक इंजेक्शन्स दिल्याची माहिती देण्यात आली. पुढील काही आठवडे तिच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. ३ डिसेंबर रोजी तिचा वाढदिवस साजरा करण्यात आला, त्यावेळी तिची प्रकृती स्थिर असल्याचे कुटुंबीयांना सांगण्यात आले होते.

# पंचायत समिती कार्यालयात चालतो अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांचे हाल बेहाल



**बीडीओने पदभार न स्वीकारल्यामुळे कामे खोळंबली**

किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी जयश्री वाघमारे यांची नियुक्ती करण्यात गुरुवारी (ता. 11) ग्रामविकास विभागाने बदलीचा शासन आदेश काढला होता. किनवट येथील रिक्त पदावर त्यांची नियुक्ती होऊनही तब्बल ११ दिवस उलटून गेले तरी त्यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही. परिणामी गटविकास अधिकारी कक्ष, सहायक गटविकास अधिकारी कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य व स्वच्छता मिशन, सांख्यिकी व बांधकाम विभागातील अनेक महत्त्वाची कामे प्रलंबित राहिली आहेत. पंचायत समिती कार्यालयातील ही परिस्थिती तातडीने सुधारावी, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून वेळेत कार्यालयीन कर्तव्य बजवावे तसेच वरिष्ठ प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी किनवट तालुक्यातील नागरिकांतून जोर धरत आहे.

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट पंचायत समितीचा कारभार कार्यालयीन वेळेनुसार न चालता कर्मचाऱ्यांच्या मनमानीवर सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित राहतात, उशिरा कार्यालयात येतात आणि दुपारच्या वेळेत कार्यालयातून निघून जातात. परिणामी ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना आपल्या कामासाठी वारंवार पंचायत समितीच्या फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत.

आठवड्याचा पहिला दिवस असलेल्या सोमवारी सकाळी पंचायत समिती कार्यालयाची पाहणी केली असता संपूर्ण कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. गटविकास अधिकारी, सहायक गटविकास अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य व स्वच्छ भारत मिशन, सांख्यिकी, एमएसआरएलएम, पाणीपुरवठा, संग्राम, बांधकाम विभाग, रोजगार हमी योजना, विस्तार अधिकारी (पंचायत), पेसा कक्ष तसेच सहायक प्रशासन अधिकारी कक्ष—या महत्त्वाच्या विभागांमध्ये एकही जबाबदार अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नव्हता. काही कॅबिनमध्ये वीज व पंखे सुरू असले तरी संबंधित अधिकारी मात्र गायब होते.

किनवट हा आदिवासी बहुल तालुका असून येथे १३४ ग्रामपंचायती अंतर्गत १५९ वाड्या, वस्त्या, पाडे व तांडे मिळून तब्बल २९३ गावे आहेत. या गावांमधील नागरिक आपल्या विविध तक्रारी, विकासकामांचे प्रस्ताव, योजना लाभ, दाखले व शासकीय कामांसाठी पंचायत समितीकडे येतात. मात्र अधिकारी-कर्मचारीच कार्यालयात उपलब्ध नसल्याने आदिवासी नागरिकांना नुसतेच हेलपाटे मारावे लागत असून कामे महिनोन्-महिने प्रलंबित राहत आहेत. नांदेडवरून किनवटकडे येणाऱ्या रेल्वे गाड्या कार्यालयीन वेळेला सुसंगत नसतानाही अनेक कर्मचारी रेल्वेने ये-जा करण्याचा अट्टाहास करतात. त्यामुळे कार्यालयीन वेळेचा मोठा भाग प्रवासात जात असल्याचे वास्तव आहे. शासकीय नियमांनुसार कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यलयीन मुख्यालयी वास्तव्यास राहून कार्यालयीन वेळेत कर्तव्य बजावणे बंधनकारक असताना पंचायत समितीतील अनेक कर्मचारी या नियमांना सर्रास 'खो' देत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

याचा थेट फटका ग्रामीण विकासकामांना बसत असून रोजगार हमी, पाणीपुरवठा, आरोग्य-स्वच्छता, पंचायत प्रशासन, पेसा अंतर्गत कामे व इतर योजनांची अंमलबजावणी ठप्प झाली आहे. त्यामुळे पंचायत समिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाची मोठी कारवाई

**बांदा : (समर्थ गांवकरी)**



गोवा–मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर इन्सुली तपासणी नाका,येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने मोठी कारवाई करत अवैधरित्या दारू वाहतूक करण्यात येणारा सुमारे ११ लाख ६८ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.ही कारवाई २३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास हॉटेल विवा क्लासिक समोर, सटमटवाडी (बांदा) येथे करण्यात आली. संशयास्पद स्थितीत असलेल्या MH-10-DT-5307 क्रमांकाच्या चारचाकी वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या मागील भागात लपवून ठेवलेले विविध ब्रँडचे ३६ बॉक्स विदेशी मद्य आढळून आले. या प्रकरणात वाहन चालक नाभीराम अंबेडकर बागडे (वय ३०, रा. रामघाटी, ता. माडा, जि. सोलापूर) यास ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त मुद्देमालामध्ये अंदाजे ३ लाख ६८ हजार ६०० रुपये किमतीचे मद्य व ८ लाख रुपये किमतीची चारचाकी वाहन, असा एकूण ११ लाख ६८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

सदर कारवाई महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत करण्यात आली आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक श्री. धनंजय सांवळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक श्री. विवेक कदम, दुय्यम निरीक्षक श्री. रणजित शिंदे तसेच जवान श्री. दीपक वाघडे, श्री. सागर सुंधेकर, श्री. अभिषेक घत्री व श्रीमती सविता चोपडे यांनी केली.पुढील तपास इन्सुली तपासणी नाका, सावंतवाडी येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात येत आहे.



कंधार नगरपरिषदेच्या नगरसेवक पदी निवडून आल्याबद्दल सौ. वैशालीताई बसवंते, दिलीप पवार, दिलीप देशमुख यांचा सत्कार करून भावी कार्याच्या शुभेच्छा देताना, कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर माजी जि.प. सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा सौ. वर्षाताई भोसीकर, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अजय मोरे. छाया - विनोद महाबळे



ठाणे : दिवा शिवसेनाचा प्रभाग क्रमांक २८ मधील प्रचाराचा शुभारंभ दिव्यातील गणेशनगर येथील श्री गणेश मंदिरात शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्याहस्ते सपत्नीक करण्यात आला. प्रसंगी शिवसेनेचे उपशहरप्रमुख, नगरसेवक/ नगरसेविका, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, शाखा प्रमुख, उपशाखाप्रमुख, महिला आघाडी,युवासेना, युवतीसेना व अंगीकृत संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

# जवळ्याच्या मुलामुलींनी दिला एकच नारा, बालविवाह मुक्त करु नांदेड जिल्हा सारा...!

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. बालविवाहाचे समर्थन किंवा यासाठी सुविधा पुरविली गेली तरी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ग्रामीण भागासह सर्वांनी याबाबत दक्ष राहणे गरजेचे आहे. कुठेही बालविवाह होणार नाही यासाठी सतत जनजागृती केली जाणार आहे. शाळा महाविद्यालयांमधूनही बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते.

# पशु व दुग्ध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद; पारितोषिकांचे वितरण

**पशुपालक व दुग्ध व्यवसायिकांसाठी प्रेरणास्थान : आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर**

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दि २३ डिसेंबर- श्रीक्षेत्र माळेगावची यात्रा ही जगातली आगळी-वेगळी यात्रा असून ती कृषी व पशुसंवर्धनासाठी विशेषतः प्रसिद्ध आहे. या यात्रेत दरवर्षी उत्कृष्ट दर्जाची पशुधन प्रदर्शने भरतात. यावर्षी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध पशु व दुग्ध स्पर्धांना शेतकरी व पशुपालकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




यावेळी स्पर्धांच्या पारितोषिक रकमेत वाढ करण्यात आली असल्याचे सांगत, पूर्वीप्रमाणे माळेगाव यात्रेत घोडा, गाढव व उंट यांच्या शर्यती पुन्हा सुरू व्हाव्यात, अशी अपेक्षा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली.

आज माळेगाव येथे आयोजित कार्यक्रमात विविध पशु व दुग्ध स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, माजी आ मोहन हंबर्डे, लोहा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष शरद पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा यात्रा सचिव डी.बी. गिरी, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, दत्ता वाले, रोहित पाटील, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, डॉ. प्रवीणकुमार घुले आदी मान्यवर उपस्थित होते.

माळेगावची यात्रा अधिक व्यापक स्वरूपात वाढावी यासाठी प्रयत्न सुरू असून, यावर्षी जिल्हा परिषदेने अचूक नियोजन केल्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले. पुढील वर्षी दुग्ध व्यवसायात वाढ व्हावी तसेच शेतकऱ्यांना जोडधंद्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध खाजगी दूध डेऱ्यांचा सहभाग घेतला जाणार असल्याचेही आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी केले. यावेळी लाल कंधारी व देवणी नर-मादी गटाचे चॅम्पियन तसेच विविध स्पर्धांमध्ये क्रमांक पटकावलेल्या स्पर्धकांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

दुग्ध स्पर्धेसाठी नमस्कार दूध डेअरी, मस्कटी दूध डेअरी व एपीएस दूध डेअरी यांनी पुढाकार घेतला. यासाठी संग्राम गाडेकर, नितीन शिंदे व सतीश कोगनळे यांनी विशेष सहकार्य करत दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.

**पशुधनाचे शास्त्रशुद्ध संगोपन करावे- जिल्हाधिकारी कर्डिले**

शेती क्षेत्रात नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी पशुधनांची संख्या कमी होत चालली आहे.पशुपालकांनी पशुधनांची संख्या वाढवून त्यांच्या आरोग्याची योग्य निगा राखावी व शास्त्रशुद्ध संगोपन करावे. दुग्ध व्यवसाय आणि पशुसंवर्धन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून अशा यात्रांमधून शेतकऱ्यांना नवी दिशा मिळते, असे मत यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी व्यक्त केले.

# रंगीत पणत्यांनी साकारली भव्य मोझॅक कलाकृती

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर परिवाराचे आयोजन

मुंबई : (समर्थ गांवकरी)

डोंबिवलीत २.५ लाख रंगेबिरंगी पणत्यांमधून साकारलेली भारतमातेची एक अफलातून मोझॅक चित्रनिर्मिती सध्या अतिशय लक्षवेधक ठरत आहे. रंगीत पणत्यांच्या माध्यमातून आकारलेल्या चित्राने जागतिक विक्रम प्रस्थापित केला असून भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराच्या माध्यमातून ही अभिनव कलाकृती तयार करण्यात आली आहे. ही रेकॉर्ड ब्रेक कलाकृती पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षक डोंबिवली जिमखाना मैदानावर गर्दी करत आहेत.



भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण डोंबिवलीसारख्या मराठी साहित्य, संस्कृती आणि कलेचं माहेरघर असलेल्या शहराचं प्रतिनिधित्व करतात. या अनोख्या उपक्रमाविषयी माहिती देताना ते म्हणले की भारतमातेचे पूजन हे संस्कार बालपणातून झालेले असल्याने आणि त्या भारतमातेचे गुणगान गाणारे व वंदन करणारे राष्ट्रगान म्हणजेच वंदे मातरम. अशा श्रद्धा व आस्थेच्या वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल डोंबिवलीत जागतिक विक्रम करण्याचा डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने निर्णय घेतला.

चेतन राऊत तसेच प्रभू कापसे व वैभव कापसे या पितापुत्रांच्या जोडीने आणि अन्य कलाकार-साथीदारांनी मिळून सतत नऊ दिवस खपून पणत्या रंगवून कलात्मकतेचा अविष्कार सादर केल्याचे गौरवोद्गार प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी काढले.

ते पुढे म्हणाले की भारतमाता आपल्यासाठी देवी स्वरूप आहे म्हणून तिचं सनातन संस्कृतीत आपण पूजन करतो. आपण सर्वजण त्याच धरतीची लेकरं आहोत आणि या मातीतूनच तयार केलेल्या पणत्यांनी मोझॅक साकारण्याची कल्पना सुचली आणि भारतमातेला, वंदे मातरम गीताला अनोखी मानवंदना देण्याचे ठरले. ९५ फूट उंची आणि ७५ फूट रुंदीची, सुमारे अडीच लाखांहून अधिक रंगीत पणत्यांचा (दिव्यांचा) वापर करून साकारलेली भारतमातेची अद्भुत मोझॅक कलाकृती निर्माण करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया अंतर्गत एक नवा जागतिक विक्रम यशस्वीपणे प्रस्थापित झालेला आहे...

ही भव्य कलाकृती कलाकार चेतन राऊत, वैभव प्रभू कापसे तसेच डोंबिवलीकर आर्टिस्ट टीम यांनी अवघ्या नऊ दिवसांत साकारली.

डोंबिवली जिमखानातर्फे उत्सव या नावाने वार्षिक मेळा आयोजित केला जातो. तिथे ही कलाकृती २८ डिसेंबर २०२५ पर्यंत खुली ठेवण्यात आली असून प्रेक्षकांनी त्याचा लाभ घ्यावा असे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आवाहन केले.

# माजी विद्यार्थी संघ मेळाव्याचे आयोजन

बेल्हे : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,बेल्हे नंबर- १ शाळेत माजी विद्यार्थी संघ मेळावा सन्मा.आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. मेळाव्याच्या निमित्ताने शाळेचे माजी विद्यार्थी असलेले अनेक डॉक्टर , इंजिनियर,वकील, प्रशासकीय अधिकारी पुणे,मुंबई येथून उपस्थित झाले होते. शाळेतील छोट्या बालचमुंनी लेझीम व ढोल ताशांच्या गजरात पाहुण्यांचं स्वागत केलं व सुंदर ईशस्तवन व स्वागतगीत सादर करीत कार्यक्रमाची सुरुवात केली. शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम शेंडकर यांनी प्रास्ताविक करत आजच्या माजी विद्यार्थी संघ मेळाव्याचा उद्देश सांगितला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री प्रितम मुंजाळ यांनी मनोगत व्यक्त करत शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या



गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न व शाळेमध्ये उपलब्ध केलेल्या भौतिक सुविधा, राबविलेले विविध उपक्रम, या विषयी माहिती दिली. शाळेचे माजी विद्यार्थी सन्मा. सुनील चोरे यांनी मनोगत व्यक्त करत सर्वांच्या सहकार्यातून आगामी काळात या शाळेत ए आय लॅब स्थापन करणार असण्याचे सांगितले .सावकार पिंगट, कैलास औटी,राहुल केदारी, शंकर शिंदे,ग्रामपंचायत सदस्या पल्लवी भंडारी, सुनील शिंदे ,जयवंत घोडके इ मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आगामी काळामध्ये शाळेला सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

# निहारिका चौक्सी, मानसी जोशी रॉय आणि इतरांनी दिल्या मनापासून शुभेच्छा आणि जागवल्या खास आठवणी

पुणे : (समर्थ गांवकरी)

ख्रिसमस हा वर्षातील असा काळ आहे जेव्हा मन हलके होते आणि सण साजरे करण्याची सर्वत्र धूमधाम असते. कुटुंबीय आणि आप्तेष्ट एकत्र येतात, आनंदाचे क्षण, परंपरा आणि आठवणी जपल्या जातात. सजलेली घरे, आनंदी गाठीभेटी, स्वादिष्ट पदार्थ आणि हसरे क्षण – ख्रिसमस म्हणजे एकत्र येण्याचा उत्सव. या आनंदी वातावरणात झी टीव्हीवरील कलाकारांनी त्यांच्या खास आठवणी आणि शुभेच्छा व्यक्त केल्या. निहारिका चौक्सी (तुम से तुम तक), विजयेंद्र कुमेरिया (जागृति – एक नयी सुबह), अनुष्का मर्चंडे (सरू), मानसी जोशी रॉय (लक्ष्मी निवास), सोनाक्षी बत्रा (जगद्धात्री), भरत अहलावत (जाने अनजाने हम मिले) आणि अमनदीप सिधू (गंगा



माई की बेटियां) यांनी चाहत्यांना शुभेच्छा दिल्या. सरूमध्ये अनिकाची भूमिका करणारी अनुष्का मर्चंडे म्हणाली, "ख्रिसमस 2025 साजरा करतानामी वर्षभर माझा पाठिंबा केलेल्या प्रत्येकाला भरपूर प्रेम आणि सकारात्मकतेच्या शुभेच्छा देऊ इच्छिते. हा सण तुमच्या घरात हसू, तुमच्या मनात आशा आणि तुमच्या आयुष्यात सुंदर क्षण आणोत, जे कायम तुमच्यासोबत राहतील. सर्वांसाठी हा ख्रिसमसजादू, एकसाथ येणे आणि येणाऱ्या वर्षाला नव्या उत्साहाने सामोरे जाण्याचे धैर्य देणारा लाभो अशी माझी मनापासून इच्छा आहे."

'जागृती – एक नयी सुबह' या मालिकेत सूरजची भूमिका करणारा विजयेंद्र कुमेरिया म्हणाला, "माझ्यासाठी ख्रिसमस म्हणजे थोडे थांबून विचार करणे, मनन करणे आणि ज्या गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत, जसे की कुटुंब, कृतज्ञता आणि देण्याची भावना – त्यांच्याशी पुन्हा जोडणे. मला अजूनही शाळेतील ख्रिसमस साजरा करण्याच्या आठवणी खूप प्रिय आहेत. मी कॉन्व्हेंट शाळेत शिकलो आणि वर्ग सजवणे, कॅरोल्स गाणे, मित्रांसोबत मिठाई वाटणे यामुळे हा सण माझ्यासाठी खूप खास झाला होता.

# शेतकऱ्यांचे नवनवीन प्रयोग

मंचर: (समर्थ गांवकरी)

रब्बी हंगामाची तयारी ग्रामीण भागात जोरात सुरू असून गहू पेरणी, कांदा व बटाटा लागवडीची कामे वेगाने सुरू आहेत. मात्र, पेरलेले बी खाण्यासाठी शेतांमध्ये पक्षी आणि प्राणी मोठ्या प्रमाणात येत असल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. नव्याने उगवणाऱ्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी विविध उपाय योजत आहेत. काही शेतकऱ्यांनी शेतात काठ्या उभारून त्यावर प्लास्टिकच्या कागदांचे फडफडणारे तुकडे बांधले आहेत, तर काही ठिकाणी बिसलरीच्या बाटल्यांमध्ये लाल रंगाचे पाणी भरून टांगले आहे.यामुळे पक्षी व प्राणी घाबरून पिकांच्या जवळ येत नाहीत.या कल्पक उपायांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान टळत आहे.

# HDFC बँकेने CSR रिपोर्टची पहिली आवृत्ती प्रसिद्ध केली

- 2024-25 या आर्थिक वर्षात 1,068 कोटी रु. CSR खर्च झाला, आत्तापर्यंत 10.56 कोटी लोकांचे जीवन प्रभावित केले

मुंबई : (समर्थ गांवकरी)

HDFC बँक या भारताच्या सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आज आपला पहिलावहिला स्वतंत्र CSR रिपोर्ट प्रसिद्ध केल्याचे जाहीर केले आहे. या अहवालात आपल्या 'परिवर्तन' या अंब्रेला प्रोग्रामच्या माध्यमातून बँकेने केलेला सामाजिक प्रभावाचा एक दशकाचा प्रवास दर्शविला आहे.

बँकेने 2024-25 या आर्थिक वर्षात आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांवर 1,068.03 कोटी रु. खर्च केल्याचे नमूद केले आहे. गेल्या वर्षापेक्षा हा खर्च सुमारे 123 कोटी रु. जास्त आहे. एकत्रितपणे, 31 मार्च 2025 रोजी बँकेने 6,176 कोटी रु. CSR प्रोग्राममध्ये गुंतवले आहेत. गेले वर्ष हे 'परिवर्तन' चे दहावे वर्ष होते. या उपक्रमाच्या अंतर्गत HDFC बँकेने 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांत मिळून 10.56 कोटी लोकांच्या जीवनाला स्पर्श केला आहे. भारत सरकारने निवडलेल्या 112 आकांक्षी जिल्हयापैकी 102 जिल्ह्यांमध्ये हे प्रकल्प लागू करण्यात आले आहेत. आपल्या ग्रामीण विकास उपक्रमांच्या अंतर्गत बँकेने 298 सीमावर्ती गावांचा देखील समावेश करून घेतला आहे. परिवर्तनचे धोरणात्मक स्तंभ / मुख्य फोकसची क्षेत्रे

या CSR वार्षिक रिपोर्टमध्ये सहा मुख्य फोकस क्षेत्रांमधील बँकेचे काम दाखवले आहे:

ग्रामीण विकास: या स्तंभाच्या आधारे, बँकेने कृषी उत्पादकता वाढवली आहे, ग्रामीण इन्फ्रास्ट्रक्चर उभारले आहे आणि लोकांना स्वच्छ पेय जल आणि स्वच्छता मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. आजपर्यंत 14.92+ लाख घरांमध्ये हा उपक्रम पोहोचला आहे.

शिक्षणाला प्रोत्साहन: या स्तंभाने शिष्यवृत्ती, इन्फ्रास्ट्रक्चर आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे. बँकेने 29,000+ शिष्यवृत्त्या दिल्या आहेत, 2,600+ स्मार्ट शाळा उघडल्या आहेत आणि 930 सामुदायिक वाचनालये बांधली आहेत.

कौशल्य प्रशिक्षण आणि जीवनमान सुधारणा: बँकेने व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेस मदत करून तरुण, महिला आणि व्यक्तींना सुसज्ज केले आहे आणि आजवर 7.2 लाख व्यक्तींना शाश्वत उपजीविका प्राप्त करण्यासाठी सक्षम बनवले आहे.

आरोग्य सेवा आणि स्वच्छता: हा स्तंभ लोकांना प्रतिबंधात्मक देखभाल, आई आणि बाळाचे आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जागरूकता यापर्यंत पोहोच मिळवून देतो. 3 लाख पेक्षा जास्त लोकांना मोबाइल क्लिनिक्स, कॅन्सर उपचार साहाय्य आणि बाळंतीण स्त्रीच्या देखभालीच्या उपक्रमांचा फायदा मिळाला आहे. आर्थिक साक्षरता आणि समावेश: या स्तंभाच्या अंतर्गत, बँक लोकांना आर्थिक जागरूकता आणि बचतीला प्रोत्साहन देऊन सशक्त करते आणि त्यांना बँकिंग आणि विमा सेवांपर्यंत पोहोच मिळवून देते. डिजिटल फसवणुकीविषयी जागरूकता आणणाऱ्या बँकेच्या व्हिजिल आँटी अभियानाचे ऑनलाइन 21 लाख+ फॉलोअर्स आहेत.

# ह्युंडाई मोटर मेन्स व विमेन्स क्रिकेट टूर्नामेंट्ससाठी पार्टनर बनली

अहमदाबाद : (समर्थ गांवकरी)

ह्युंडाई मोटर कंपनीने आज इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल (आयसीसी) सोबत जागतिक सहयोगाची घोषणा केली, जेथे 2026 ते 2027 पर्यंत आयसीसीच्या प्रतिष्ठित टूर्नामेंट्ससाठी प्रीमियर पार्टनर बनली आहे. प्रीमियर पार्टनर म्हणून ह्युंडाई मोटरला आयसीसीच्या आगामी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांचे विशेष अधिकार व संधी मिळाली आहे, ज्यामध्ये मेन्स क्रिकेट वर्ल्ड कप 2027 चा देखील समावेश आहे. तसेच या अधिकारांतर्गत कंपनीला सामन्यामधील महत्त्वपूर्ण क्षण जसे नाणेफेकमध्ये सहभाग घेता येईल, स्टेडियममध्ये प्रमुख ब्रँडिंग मिळवता येईल आणि चाहत्यांना उत्साहवर्धक अनुभव देता येईल. या सहयोगामधून क्रीडाप्रती समान आवडीच्या माध्यमातून जगभरातील विविध प्रेक्षकांसोबत



दृढ नाते निर्माण करण्याप्रती ह्युंडाई मोटरची कटिबद्धता दिसून येते. हा सहयोग भारतासारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये ब्रँडची उपस्थिती अधिक दृढ देखील करतो, जेथे क्रिकेटला महत्वपूर्ण स्थान आहे. ह्युंडाई मोटर कंपनीचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जोस मुनोज म्हणाले, क्रिकेट व ह्युंडाईची सुधारणा घडवून आणण्याप्रती, तसेच प्रत्येक आव्हानावर मात करण्याप्रती समान कटिबद्धता आहे. आम्हाला आयसीसीसोबत सहयोग करण्याबद्दल सन्माननीय वाटत आहे, ज्यासह जगभरातील दोन बिलियनहून अधिक निस्सीम क्रिकेटप्रेमींसोबत कनेक्ट होण्याची संधी मिळाली आहे. क्रिकेटला सर्वाधिक महत्त्व दिल्या जाणाऱ्या भारतासारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये हा सहयोग ग्राहक व समुदायांसोबत आमचे संबंध अधिक प्रबळ करतो, ज्यामधून आम्हाला करणाऱ्या प्रत्येक गोष्टीमध्ये प्रेरणा मिळते. आम्ही या प्रख्यात टूर्नामेंट्समध्ये सहयोगाने संस्मरणीय अनुभव निर्माण करण्यास उत्सुक आहोत. आयसीसीचे अध्यक्ष श्री. जय शाह म्हणाले, क्रिकेट जगातील सर्वात लोकप्रिय खेळ आहे, जेथे विशेषत: आयसीसीच्या मार्की इव्हेण्ट्सदरम्यान दोन बिलियनहून अधिक क्रिकेटप्रेमींची अत्यंत आवड दिसून येते.

हे जागतिक इव्हेण्ट्स नाविन्यपूर्ण डिजिटल व स्टेडियममधील उत्साहवर्धक सुविधांच्या माध्यमातून क्रिकेटप्रेमींशी संलग्न होण्याची उत्तम संधी देतात. आम्ही प्रीमियर पार्टनर म्हणून ह्युंडाईचे स्वागत करतो, तसेच सहयोगाने उल्लेखनीय इव्हेण्ट्सचा आनंद देण्यास उत्सुक आहोत.

ह्युंडाई जागतिक ब्रँड आहे, ज्याने दीर्घकाळापासून क्रीडाला पाठिंबा दिला आहे आणि आम्ही या इव्हेण्ट्समध्ये आमच्या एकत्रित क्षमता प्रबळ करण्यास उत्सुक आहोत.

# शेतकऱ्यांच्या शेकोट्या बंद

मंचर : (समर्थ गांवकरी)

आंबेगाव परिसरात थंडीचे तीव्र वातावरण सुरू असतानाच बिबट्यांच्या वाढत्या हालचालीमुळे शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.परंपरेने वाड्यावर किंवा घराजवळ रात्रीच्या जेवणानंतर आठ–साडेआठ वाजता शेकोटी पेटवून गप्पांचा फड रंगवणारे शेतकरी आता मात्र सावध झाले आहेत.पूर्वी शेकोट्या हा केवळ उबेसाठी नव्हे, तर शेतकऱ्यांच्या एकत्र येण्याचा आणि गावातील विषयांवर चर्चा करण्याचा महत्त्वाचा भाग होता. मात्र गेल्या काही आठवड्यांत बिबट्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढत चालल्याने रात्री उघड्यावर बसणे धोकादायक झाले आहे. अनेकांनी वाड्यांवर तर काहींनी घरासमोरील शेकोटी पूर्णपणे बंद केल्या आहेत.पहाटेच्या थंडीसाठी अनेक ठिकाणी शेकोट्या पेटवल्या जात असत.

# शुक्रवारपासून खंडोबा यात्रोत्सवाचा शुभारंभ!

डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील डोंगरगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडोबा (सटी) यात्रोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या यात्रोत्सवास शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर 2025 पासून उत्साहात सुरुवात होणार आहे.

शुक्रवारी सकाळी 7.30 वाजता मान्यवरांच्या हस्ते अभिषेक व विधिवत पूजा करण्यात येणार असून सकाळी 8.00 वाजता हनुमान भजनी मंडळाची भजनसेवा होणार आहे.

सायंकाळी 4.00 वाजता मानाच्या काठीची पूजा करून हनुमान मंदिर ते पाऊत्के अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी 6.30 वाजता पाऊत्के पासून खंडोबा मंदिरापर्यंत डी.जे., फटाके व आतषबाजीसह भव्य मिरवणूक होणार आहे. या यात्रोत्सव कार्यक्रमास आमदार



डॉ. किरण लहामटे, जालिंदर वाकचौरे, तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अभियंता शेळके, उपअभियंता भोये, गटविकास अधिकारी अमर माने, वनविभाग अधिकारी पंकज देवरे, पाणीपुरवठा अधिकारी बिन्नर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यात्रोत्सवाच्या निमित्ताने रात्री 9.00 वाजता कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे (मांजरवाडीकर) यांच्या लोकनाट्य तमाशा मंडळाचा मोफत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तसेच शनिवार, दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 8.30 वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून दुपारी 4.00 वाजता जंगी हंगामा होणार असून हागाम्याचा शेवटच्या कुस्तीसाठी डोंगरगाव केसरी ट्रॉफी देऊन गौरवण्यात येणार आहे.

खंडोबा (सटी) यात्रोत्सवानिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवदर्शन व विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायत, यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्लोबल मैत्री फेस्टिव्हल २०२५ चे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)

मैत्रीबोध परिवाराच्या वतीने ग्लोबल मैत्री फेस्टिव्हल हा वर्षातील सर्वात प्रतीक्षित सोहळा आयोजित केला जाणार आहे. हा या महोत्सवाचा सातवा वार्षिक सोहळा असून, यात भारताची समृद्ध संस्कृती तसेच मैत्रीभाव आणि सेवाभाव यांसारख्या मूलभूत मूल्यांचे भव्य दर्शन घडते. २७ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथील पोलिस परेड ग्राउंडवर आयोजित करण्यात येणार आहे. १२,००० हून अधिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत होणारा हा भव्य महोत्सव आयोजित केला जात असून भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाचे त्याला पूर्ण समर्थन लाभले आहे. या वर्षीच्या महोत्सवात अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. त्यामध्ये केंद्रीय कायदा व




न्याय मंत्री श्री अर्जुन मेघवाल, केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक विशिष्ट पाहुण्यांचा समावेश आहे. तसेच ज्येष्ठ व लोकप्रिय कलाकार जॅकी श्रॉफ, स्मिता जयकर आणि काजल अग्रवाल हेही या सोहळ्याची शोभा वाढवणार आहेत. यावर्षी महोत्सवाला सांस्कृतिक भागीदार म्हणून मैत्री कल्चरल इकॉनॉमी समिटचे सहकार्य लाभले आहे.

# Ai+ ने NovaPods सादर केले, जे तुमच्या कानांपर्यंत हृदयाचे ठोके ट्रॅकिंगची सुविधा आणत आहेत

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

Ai+ ने आज NovaPods, आपली पहिली ऑडिओ उत्पादनांची मालिका जाहीर केली, ज्यामुळे ब्रँडच्या कनेक्टेड डिव्हाइस इकोसिस्टममध्ये वेअरेबल ऑडिओचा एक नवीन स्तर जोडला गेला आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत लॉन्च होणारे आणि ₹१,००० पेक्षा कमी किमतीपासून सुरू होणारे NovaPods, दिवसभर वापरण्यासाठी डिझाइन केले आहेत. यामध्ये विश्वासार्ह ऑडिओ, आराम, योग्य फिट, आकर्षक डिझाइन आणि आरोग्याच्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. NovaPods




मालिकेत Ai+ NovaPods Go, Air, Pro, Beats, आणि Clips यांचा समावेश आहे. NovaPods Go, एक हलके इअरबड, प्रवासात असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केले आहे, ज्यात सुवाह्यता आणि सोयीला प्राधान्य दिले आहे.

NovaPods Air आराम आणि दमदार ऑडिओ अनुभवाचा संगम देते, सोबतच स्टाईलशी कोणतीही तडजोड करत नाही.

NovaPods Pro, इमर्सिव्ह ऑडिओ अनुभवासाठी वर्धित आवाजाची स्पष्टता आणि ॲक्टिव्ह नॉइज कॅन्सलेशन प्रदान करते.

NovaPods Beats केवळ दमदार बासच देत नाही, तर सक्रिय आणि आरोग्याबाबत जागरूक वापरकर्त्यांसाठी यात हृदय गती ट्रॅकिंग आणि SpO2 मॉनिटरिंगची सुविधा देखील समाविष्ट आहे.

NovaPods Clips मध्ये आरोग्य, फॅशन आणि इमर्सिव्ह ऐकण्याचा अनुभव यांचा संगम होतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना त्यांच्या सभोवतालच्या परिसराची अधिक जाणीव होते.

या मालिकेतील सर्व NovaPods, Ai+ स्मार्टफोन मालिकेप्रमाणेच आकर्षक, तरुण रंगांमध्ये उपलब्ध असतील.

या घोषणेप्रसंगी बोलताना, माधव शेठ, सीईओ, Ai+ स्मार्टफोन आणि संस्थापक, NxtQuantum Shift Technologies म्हणाले, "NovaPods हे तंत्रज्ञानाला दैनंदिन जीवनात अखंडपणे समाकलित करण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या मालिकेसह, आम्ही केवळ एक उत्पादन देत नाही; तर आम्ही वापरकर्त्यांना आराम आणि कार्यक्षमतेच्या एका नवीन स्तराचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करत आहोत, जो त्यांच्या जीवनशैलीत सहजपणे जुळवून घेतो. Ai+ मध्ये, आमचे ध्येय आहे की वापरकर्त्यांना कोणतीही गुंतागुंत किंवा खर्चाचा बोजा न टाकता सक्षम करणे."

NovaPods चे लॉन्च हे Ai+ च्या कनेक्टेड उत्पादने तयार करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे, जी एकत्र काम करतात आणि वापरण्यास सोपी आहेत. उत्पादनाची संपूर्ण वैशिष्ट्ये, किंमतीचे तपशील आणि उपलब्धता लॉन्चच्या जवळ जाहीर केली जाईल. NovaPods जानेवारी २०२६ मध्ये फ्लिपकार्ट आणि निवडक ऑफलाइन भागीदारांद्वारे देशभरात लॉन्च केले जातील.

# विज्ञान प्रदर्शन शास्त्रज्ञ घडवण्यासाठी उपयुक्त

- गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड
- ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान- गणित प्रदर्शन उद्घाटन+

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. या दृष्टीने विकसित व आत्मनिर्भर भारत 2047 यासाठी संपूर्ण देश पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या अनुशंगाने शासकीय स्तरावरून विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम देखील राबविण्यात येत आहेत.या प्रयत्नाचा एक भाग म्हणून विज्ञान प्रदर्शन हे अत्यंत आवश्यक आहेत. कारण यातूनच भविष्यातील शास्त्रज्ञ घडतील व तंत्रज्ञानात प्रगती घडवतील असा सार्थ विश्वास वाटतो, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी



शिवाजी कराड यांनी केले.

पंचायत समिती शिक्षण विभाग ,पाथर्डी ,विज्ञान -गणित अध्यापक संघटना व संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 53 व्या तालुकास्तरीय विज्ञान गणित प्रदर्शनात ते अध्यक्षपदावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रदर्शन प्रमुख रामनाथ कराड, सहदेव दादा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव महेंद्र शिरसाट, प्राचार्य सुरेश मिसाळ, तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी,ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री,अमोल कांकरिया,अनिल खाटेर, विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील कटारिया, गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष राजू पवार या सह संघटनेचे पदाधिकारी संपत घारे,चंद्रकांत उदागे,आदिनाथ शिदोरे, धर्मराज शिरसाट, संतोष लोव्हाडे, अरुण नेहूल, सुभाष सोनवणे, सुनील शिरसाट, विविध विद्यालयाचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विविध संघटनांचे पदाधिकारी, श्री गहिनीनाथ शिरसाट, बाळासाहेब गोलार, सुनिल खेडकर, अशोक कराड, रामदास दहिफळे, राजेंद्र जायभाये, बाळासाहेब वामन, मुजीब इनामदार, भास्कर बारगजे, राहुल अकोलकर, संतोष कुसाळकर, आण्णासाहेब फलके, सीताराम सावंत उपस्थित होते.

यावेळी या प्रदर्शनाचे प्रास्ताविक करताना प्रदर्शन प्रमुख रामनाथ कराड यांनी प्रदर्शनाची सविस्तर माहिती दिली.तीन दिवस या ठिकाणी विज्ञान यात्रेचे स्वरूप प्राप्त होणार असून तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक मिळून 404 शाळांनी सहभाग घेतला असून ही बाब निश्चित गौरवास्पद आहे असे प्रतिपादन केले. विशेष म्हणजे सर्व उपकरणांचे नि:पक्षपातीपणे परीक्षण व्हावे यासाठी नेवासा शेवगाव व नगर तालुक्यातील विज्ञान व गणिताचे तज्ञ शिक्षक परीक्षक म्हणून निमंत्रित केल्याची माहिती दिली.तसेच यावेळी जिल्हा विज्ञान अध्यापक संघटनेच्या वतीने तालुक्यातील इयत्ता सहावी व नववी या वर्गासाठी घेतलेल्या स्पर्धा परीक्षेतील जिल्हा विज्ञान गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## 'नगर मनपा सार्वत्रिक निवडणुक' : नागरिकांसाठी तक्रार निवारण व आचारसंहिता नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक जाहीर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्य निवडणूक आयोगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे येथील महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने नागरिकांना आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याबाबत माहिती व तक्रार देण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे.




त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, नागरिकांसाठी तक्रार निवारण व आचारसंहिता नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृह नेता यांच्या दालनात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी श्रीमती सायली अशोक सोळंके (मोबाईल क्रमांक ७०३८१७२७८५) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, त्यांना सहाय्यक म्हणून नगररचना विभागाचे रचना सहाय्यक जितेंद्र शेळके (मोबाईल क्रमांक ९९२२७७७११६), अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ (मोबाईल क्रमांक ९५६१००४६१८), क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख (मोबाईल क्रमांक ९८२२६५२७८२) यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेल्या वेळेपासून व दिनांकापासून लागू झाली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहील. ही आचारसंहिता महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील.

## विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना दैवत मानून त्यांच्या आज्ञेचे पालन करावे : डॉ. वसंत हंकारे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित सरस्वती विद्यालय उदापूरचे स्नेहसंमेलन अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना समाज प्रबोधनकार डॉक्टर वसंत हंकारे यांनी मुलींवर होणाऱ्या वाढत्या अत्याचारां विषयी बोलताना बदललेली सामाजिक परिस्थिती, मोबाईलचा अतिवापर व संस्कार या विषयी आपले विचार व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना दैवत मानून त्यांच्या आज्ञेचे पालन केल्यास खऱ्या अर्थाने त्यांचे जीवन सुखी आणि आनंदी होईल. परंतु मोबाईलच्या अतिवापरामुळे आणि वाईट संगतीमुळे तरुण वयातील मुले वाईट सवयींच्या आहारी जाऊन



आपल्या आई-वडिलांचा अनादर करताना दिसतात. आई वडील मुलांना फक्त जन्म देत नसून त्यांचे पालन पोषण करण्यासाठी अपार कष्ट घेत असतात. मुलांनी देखील आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्या आज्ञेचे पालन करावे. संस्कार आणि चांगल्या सवयी बाजारात विकत मिळत नसून त्या शाळेत रुजवल्या जातात. मुलांनी कितीही मोठे झाले तरी आपल्या आई-वडिलांना विसरता कामा नये आई वडील हेच खरे आपले दैवत आहेत असे विचार त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी कन्सल्टिंग सर्व्हिसेस प्रा. लि. पुणेचे सिनि.टीम लीड सुधीर दत्तात्रय शिंदे तर प्रमुख पाहुणे कोल्हापूर येथे उद्योजक म्हणून कार्यरत असलेले रामदास भोर व अकाउंट मॅनेजर म्हणून कार्य करणारे सुनील हरिभाऊ ढोबळे होते. याप्रसंगी उदापूर गावचे सुपुत्र देवेन नामदेव शिंदे यांची भारतीय लष्करात लेफ्टनंट पदी नियुक्ती झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.



## केशरबाई दत्तात्रय फाटेकर यांचे निधन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील ज्येष्ठ नागरिक केशरबाई दत्तात्रय पाटेकर (वय 84 वर्ष) यांचे दि 22 सोमवारी रोजी निधन झाले असून त्यांच्यावर दि. 23 मंगळवारी रोजी 12 वाजता लोणी (बु.)येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. केशरबाई दत्तात्रय फाटेकर यांच्या पश्चात पती, २ मुले, १ मुली , सुना,नातवंडे असा परिवार आहे.त्या आनंदराव दत्तात्रय फाटेकर यांच्या आई होत.

## पिंपळगाव नाकविंदा केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न!

**पिंपळगाव : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा परिषद व पंचायत समिती अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळगाव नाकविंदा केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा नुकत्याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेरणखेल येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या.

या क्रीडा मेळाव्यात पिंपळगाव नाकविंदा केंद्राअंतर्गत येणाऱ्या नऊ जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धांमध्ये वैयक्तिक तसेच सांघिक अशा दोन्ही प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले कसब पणाला लावले. वैयक्तिक क्रीडा प्रकारांत धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळीफेक या स्पर्धांचा समावेश होता; तर सांघिक प्रकारांत कबड्डी व खो-खो



(लहान गट व मोठा गट) या खेळांचा थरार पाहायला मिळाला.

प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख मा. श्री. देवेंद्र अंबेटकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. मार्गदर्शन करताना श्री. अंबेटकर म्हणाले की, "क्रीडा स्पर्धांमुळे मुलांचा शारीरिक, मानसिक व सामाजिक असा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि याच स्पर्धांतून उद्याचे राष्ट्रीय खेळाडू घडत असतात."

या कार्यक्रमासाठी शेरणखेल गावचे सरपंच मा. श्री. दीपक पथवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश कासार, तसेच मुख्याध्यापक श्री. लालू वायळ उपस्थित होते.

स्पर्धांचे पंच म्हणून जयसिंग कानवडे, रमेश धोंगडे, पोपट चौधरी, रवी रुपवते, किशोर हासे, निलेश वाकचौरे, विठ्ठल चव्हाण, विष्णू भांगरे, गणपत मुठे, वाळू पथवे, सौ. सुनीता जगताप, प्रशांत गवारी, दिनकर बर्वे, योगेश मडके, भाऊराव साबळे, गणपत सहाणे यांनी जबाबदारी पार पाडली.

या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी माननीय विस्ताराधिकारी व सर्व शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जोरदार निदर्शने

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज दिनांक 23 डिसेंबर 2025 रोजी अकोले तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढून जोरदार निदर्शने करण्यात आली. केंद्र व राज्य सरकार तसेच स्थानिक प्रशासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

एकात्मिक महिला व बालकल्याण विभाग, ICDS अंतर्गत अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील अकोले शहरी प्रकल्प तसेच अकोले व राजूर प्रकल्पांमधील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी आज अंगणवाडी केंद्र बंद ठेवून मोर्चात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन वाढ जाहीर केली होती. मात्र प्रत्यक्ष



अंमलबजावणीत अनेक अटी-शर्ती लावून प्रोत्साहन भत्त्याच्या जाळ्यात अंगणवाडी ताईंना अडकवण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तब्बल एक वर्ष उलटूनही केवळ ४ ते ५ टक्के कर्मचाऱ्यांनाच तोही अत्यल्प प्रमाणात प्रोत्साहन भत्ता मिळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

मोर्चात कोणतेही निकष न लावता सर्व सेविका व मदतनीसांना १०० टक्के प्रोत्साहन भत्ता मानधनात रूपांतरित करून देण्यात यावा, ही प्रमुख मागणी करण्यात आली. यासह थकीत इंधन खर्च, प्रवास खर्च, अमृत आहार खर्च व इतर थकबाकी तातडीने अदा करावी; जीर्ण व मोडकळीस आलेल्या अंगणवाडी केंद्रांची नव्याने उभारणी करावी व नादुरुस्त केंद्रे तात्काळ दुरुस्त करावीत; कमी शिक्षित अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर कामाचा अवाजवी बोजा टाकू नये; नवीन तंत्रज्ञान हाताळणे शक्य नसलेल्या सेविकांसाठी शासकीय खर्चाने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करावी; दिवाळीला दोन महिने उलटूनही न मिळालेली भाऊबीज तात्काळ जमा करावी; तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांना निवडणूक व इतर बाह्य कामांपासून मुक्त ठेवावे, अशा अनेक मागण्या प्रशासनाच्या माध्यमातून शासनाकडे मांडण्यात आल्या.

या आंदोलनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष चे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी पक्ष कार्यालयात झालेल्या सभेत मार्गदर्शन केले. देवठाण स्टेशनसह पुणे-नाशिक रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाची माहिती त्यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिली. या लढ्यात सहभागी होण्यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर अकोले येथून निघालेला भव्य मोर्चा तहसील कचेरीसमोर आल्यानंतर सभेत रूपांतरित झाला.

## दुगाड फाटा येथे भात खरेदी केंद्राचे उद्घाटन

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील दुगाड फाटा येथे नुकतेच भात खरेदी केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. सदर आधारभूत भात खरेदी केंद्राचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनंता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. हे भात खरेदी केंद्र गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहे. भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांचा हा केंद्रावर मोठा विश्वास असून आधारभूत दराने भात खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळत आहे. खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी लूटमार, वजनात कपात व दरांतील फसवणूक या केंद्रामुळे थांबली आहे. उद्घाटनप्रसंगी अनंत पाटील यांनी सांगितले की, शेतकरी तेच भात शेती केंद्राचेहा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या मालाला योग्य दर मिळणे आवश्यक आहे.



## शिवणकला प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

डिसेंट फाउंडेशन, पुणे , हायस्पीड स्किल हब जुन्नर व पारुंडे गावचे सरपंच किसन जाधव यांच्या संयुक्त विद्यमाने "मोफत शिवणकला प्रशिक्षण व उद्यम आधार कार्ड वाटप" हा उपक्रम आयोजित करण्यात आला.या प्रशिक्षणाचा शुभारंभ मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता अस्मिता भवन,पारुंडे ता:- जुन्नर, जि:-पुणे येथे संपन्न झाला .४० दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये महिलांना शिवणकलेचे सखोल मार्गदर्शन देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना उद्यम आधार कार्ड देण्यात येईल. डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ.एफ. बी.आतार यांच्याकडून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोन गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन भेट देण्यात येणार असून या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविणे व रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा असल्याचे डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी यावेळी सांगितले .

या प्रसंगी हायस्पीड स्किल हबचे संस्थापक दिलीप भगत ,डिसेंट फाउंडेशनचे सेक्रेटरी डॉ.एफ. बी.आतार ,पारुंडे गावचे सरपंच किसन जाधव ,प्रशिक्षक शितल पवार ,माजी सरपंच सविता जाधव ,मंगल तांबे व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती पुंडे यांनी केले

# किनवट नगर परिषद उपनगराध्यक्ष व स्विकृत सदस्य पदा करिता रस्सीखेच

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्ष पदी शिवसेना उबाठा गटाच्या सौ. सुजाता विनोद ऐंड्रलवार ह्या ३९९६ मताधिक्क्याने विजयी झाल्या नंतर एकतर्फी झालेली निवडणुक युवा नेते करण ऐंड्रलवार यांनी "लगान चित्रपटातील" भारतीय संघातील टीम प्रमाणे आपली टीम प्रतित व्हावी अशी टीम घेऊन हि निवडणुक लढवली ज्यामध्ये एकतर्फी विजय खेचुन आणला.

तरी आता उपनगराध्यक्ष पदा करिता सर्वच इच्छुकांमध्ये रस्सीखेच सुरु झालेली आहे, यामध्ये आकडेमोड करने सुरु झालेले आहेत. तर भाजपा गठीत महायुतीची सत्ता आली असती तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांच्याकडे उपनगराध्यक्ष पद निवडणुकीच्या




पुर्वी झालेल्या चर्चेअंती गेले असते परंतु साजिद खान हे पराभुत झाले असुन त्यांच्या पत्नी जरीना खानम खान विजयी झाल्या आहेत. तरी आता महाविकास आघाडीची सत्ता आल्याने उपनगराध्यक्ष पदा संदर्भात काय घडामोडी घडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तरी सभागृहातील पक्षीय बलाबल पाहता शिवसेना उ.बा. ठा. पक्षाचे ३ सदस्य निवडुन आले तर सहयोगी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे ५ सदस्य निवडुन आहे तर महाविकास आघाडी पुरस्कृत २ अपक्ष सदस्य निवडुन आलेले आहेत. तर महायुतीचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ५, भाजपाचे ४, शिवसेना शिंदे गटाचे १ असे पक्षिय बलाबल असुन यामध्ये प्रभाग क्रमांक १ मधुन अपक्ष निवडुन आलेले ३ नगरसेवक सौ. प्रिती धिरज नेम्मानिवार, प्रभाग क्रमांक ७ मधुन निवडुन आलेल्या सौ. ललिता मारोती मुनेश्वर, प्रभाग क्रमांक ५ मधुन निवडुन आलेले चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार ह्यांच्याकडे निर्णायक मत असल्याने त्यांचे महत्व वाढले आहे. तरी गरज पडल्यास नगराध्यक्षांना सुध्दा निर्णायक मत टाकण्याचा अधिकार असतो.

परंतु महाविकास आघाडी तर्फे प्रभाग क्रमांक २ मधुन निवडुन आलेले हसन लाला खान हे उपनगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत आघाडीवर असुन ते माजी आमदार स्व. प्रदीप नाईक यांचे अत्यंत निष्ठावान असुन त्यांना निवड्णुकीत महायुतीचे साजिद खान यांनी घड्याळ निशानी घेऊन निवडणुक लढवण्याचे प्रस्ताव दिले असता त्यांनी स्वतःच्या पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचा पर्याय स्विकारला होता तर झालेल्या निवडणुकीत आघाडीतील सहयोगी उमेदवार व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारास आपल्या प्रभागातुन प्रचंड मतदान मिळवुन दिले. तर दुस-या क्रमांकावर प्रविण राठोड यांचे नाव चर्चेत असुन प्रविण राठोड देखिल नाईक घराण्याचे एकनिष्ठ आहेत. तर नाईक घराण्याचे अत्यंत निकटवर्तीय म्हणुन परिचित असलेले प्रभाग क्रमांक ५ मधुन निवडुन आलेले चंद्रशेखर नेम्मानिवार हे देखिल उपनगराध्यक्ष पदाच्या स्पर्धेत आहेत. तर माजी नगराध्यक्ष साजिद खान यांचा पभराव केलेले प्रभाग क्रमांक ९ मधील मिर्झा व प्रभाग क्रमांक १० मधुन विजयी झालेले माजी उपनगराध्यक्ष अभय महाजन देखिल स्पर्धेत आहेत.

तर महायुतीतर्फे शिवसेना शिंदे गटाचे सुरज सातुरवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, सौ. सरोजीनि बाबुराव ओद्दीवार, सौ. निकिता स्वागत आयनेनिवार, संतोष म्हरसकोल्हे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या गोटातुन अभय नगराळे, जरिना साजिद खान यांची नावे देखिल चर्चेत आलेली आहेत. तर सौ. प्रिती धिरज नेम्मानिवार यांच्या निर्णायक मता करिता त्यांना देखिल उपनगराध्यक्ष पदाची संधी चालुन आलेली आहे. शहरातील एकुण राजकिय समिकरण पाहता विविध पक्षाकडुन तुरळक सदस्य निवडुन आल्याने उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सर्वांना एकत्रित आणने ही तारेवरची कसरत ठरणार आहे.

या सोबतच स्विकृत सदस्य पदाच्या शर्यतीत दोन्ही बाजुकडील अनेक इच्छुक असुन यामध्ये माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष साजिद खान, माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील, माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार, माजी नगराध्यक्ष दिपक नेम्मानिवार, माजी उपनगराध्यक्ष अनिलराव तिरमनवार, श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार, माजी उपनगराध्यक्ष वेंकट गोपाळराव नेम्मानिवार, उद्योजक श्रीनिवास गोपाळराव नेम्मानिवार, राजु सातुरवार, संतोष यलचलवार, फेरोज तंवर, ॲड. माझोद्दीन बडगुजर, किरण तिरमनवार, उद्योजक पंकज माडपेल्लीवार, पत्रकार मधुकर अन्नेलवार यांच्यासह महायुतीमध्ये शिंदे गटाच्या उमेदवारा करिता आपली उमेदवारी मागे घेतलेले माजी उपनगराध्यक्ष अजय चाडावार यांची नावे स्विकृत सदस्य पदाकरिता चर्चिली जात आहे.

आता महायुतीतील घटक पक्षाचे नेते भाजपाचे आ. भिमराव केराम, रा.कॉ चे आ. प्रताप पाटील चिखलीकर तर शिवसेनेचे आ. हेमंत पाटील काय भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. तर महाविकास आघाडी तर्फे संपुर्ण निवडणुकीत किल्ला लढवलेले जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे, रा.कॉ नेत्या बेबीताई नाईक व युवा नेते कपिल नाईक व करण ऐंड्रलवार यांची निर्णायक भुमिका राहणार आहे.

# प्रयोगशीलतेतून यशाचा मार्ग

- अकोले तालुक्यातील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी (मामा) यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख!

**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील गर्दणी येथील उत्कृष्ट, प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी म्हणून सर्वदूर परिचित असलेले शिवाजीराव नामदेव नाईकवाडी (मामा) यांचा वाढदिवस तालुक्यात उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा होत आहे. शेती क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग करत पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देणारे शेतकरी म्हणून त्यांची ओळख आहे.

शिवाजीराव नाईकवाडी यांनी सुधारित बियाणे, आधुनिक सिंचन पद्धती, ठिबक व तुषार सिंचन, पीक नियोजन, माती परीक्षण, तसेच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेतीत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विविध प्रकारची पिके घेऊन जोखीम कमी करत उत्पन्न वाढवण्यावर त्यांनी भर दिला. “योग्य नियोजन आणि कष्टाची जोड असेल तर शेती आजही नफ्याचा व्यवसाय होऊ शकतो,” हा त्यांचा ठाम विश्वास आहे.

अत्यंत संघर्षमय परिस्थितीतून वाट काढत त्यांनी आपल्या कुटुंबाचे व परिसराचे नाव तालुक्यात उज्ज्वल केले. शिक्षण मर्यादित असले तरी अनुभव, अभ्यासू वृत्ती आणि प्रामाणिक कष्ट यांच्या जोरावर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात नावलौकिक मिळवला. कै. नामदेवराव नाईकवाडी यांच्या परिवारात जन्मलेल्या शिवाजीराव नाईकवाडी यांना वारकरी संप्रदायाचा वारसा लाभला असून सत्यनिष्ठा, शब्दाला जागणे, दिलेला शब्द पाळणे, मैत्री निभावणे आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे, हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

ते केवळ यशस्वी शेतकरीच नाहीत, तर मार्गदर्शक म्हणूनही ओळखले जातात. अनेक तरुण शेतकऱ्यांना ते शेती, व्यवसाय, आर्थिक नियोजन आणि जीवनमूल्यांबाबत मार्गदर्शन करत असतात. कर्ज घेणे ही प्रगतीची गोष्ट असली तरी कर्जफेड ही बाजारातील पत असल्याचे ते वारंवार सांगतात. कर्जमाफीच्या अपेक्षेवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने पाहावे, असा त्यांचा स्पष्ट संदेश आहे.

शेतीसोबतच त्यांनी विविध व्यवसाय सुरू करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. “फक्त नोकरीच्या मागे न लागता व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे,” तसेच “शेतीला योग्य ते महत्त्व दिले पाहिजे,” असे त्यांचे मत आहे. आजच्या घडीला शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या भविष्यासाठी शेतीकडे दुर्लक्ष होऊ नये, यावर ते नेहमी भर देतात.

नाईकवाडी परिवाराचा अकोले तालुक्यातील अनेक गावांशी घनिष्ठ संबंध असून सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील विविध निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशात शिवाजीराव नाईकवाडी यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. “पैसा कमवण्यापेक्षा माणसे जोडणे अधिक महत्त्वाचे,” ही त्यांची जीवनदृष्टी असून आजही तालुक्यातील गावागावात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो तसेच शेती, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य अधिकाधिक बहरो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

शिवाजीराव नाईकवाडी (मामा) यांचा वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा क्षण नसून, संपूर्ण शेतकरी वर्गासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना तालुक्यात व्यक्त होत आहे.

# निकालाच्या पार्श्वभूमीवर कणकवली बॅनरवॉर

**कणकवली : (समर्थ गांवकरी)**

शहरात आता बॅनर वॉर रंगू लागले असून कणकवली नगरपंचायत च्या निवडणुकीच्या अनुषंगाने काल दुपारी नाईक हितचिंतकांकडून उपरोधी टीका करणाऱ्या बॅनरला सावंत - नलावडे समर्थकांनी जोरदार बॅनर द्वारे शेलक्या शब्दात प्रत्युत्तर दिले.

कणकवली शहरात फ्लाय ओव्हर ब्रिज खाली दोन ठिकाणी नलावडे - सावंत हितचिंतकांकडून हे बॅनर लागले असून कणकवलीत श्रीधर नाईक चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक या दोन ठिकाणी हे बॅनर लावण्यात आले. यातील एका बॅनर मध्ये "भावाच्या गोट्या काढणाऱ्यांच्या पाठिंब्यावर उभे राहून स्वतःच्या गोट्या वाचवणाऱ्यांनी बोलूच नये" #सावंत नलावडे हितचिंतक. तर दुसऱ्या बॅनर वर "वांझोटेच्या बाळंतपणाला समर्थकांचा लागला" टेस्ट ट्यब बेबी. #सावंत नलावडे हितचिंतक अशा दोन आशयाचे बॅनर लावण्यात आले होते. याबॅनरमुळे नाईक हितचिंतकांकडून लावलेल्या बॅनरला अगदी शेलक्या शब्दात काही तासांमध्येच प्रत्युत्तर देण्यात आले आहे. सावंत - नलावडे समर्थकांकडून या बॅनरद्वारे दिलेल्या शेलक्या शब्दातील प्रत्युत्तरामुळे येत्या काळात कणकवलीत अशाच प्रकारे वार पलटवार होणार असल्याचे संकेत या बॅनरवॉर च्या माध्यमातून देण्यात आले आहेत.

काल रात्रीपासूनच कणकवली शहरात या बॅनरची चर्चा सुरू आहे. दरम्यान काल दुपारी नाईक हितचिंतकांनी लावलेला बॅनर काही वेळानंतर पोलिसांच्या सूचनेनंतर नगरपंचायतने हटवला आहे.

# महागावात कृषिदूतांचे आगमन




**महागाव (ता. मावळ) : (समर्थ गांवकरी)**

महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण कृषि कार्यानुभव (RAWE) व कृषी औद्योगिक संलग्नता (AIA) कार्यक्रमाअंतर्गत कृषिदूत म्हणून कार्यरत असलेले विद्यार्थ्यांचे पथक महागाव गावात दाखल झाले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत कृषिदूतांकडून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, मृदा आरोग्य, कीड-रोग नियंत्रण, शाश्वत शेती तसेच कृषी विषयक विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कृषी विद्यापीठातील शैक्षणिक ज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत उपयोग करून शेतकऱ्यांपर्यंत नवे प्रयोग पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महागाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने कृषिदूतांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच इंद्रजीत पडवळ, उपसरपंच यमुना मरगळे, ग्रामपंचायत अधिकारी एल. एस. सावळे तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या उपक्रमात कृषिदूत म्हणून सौरभ घरदाळे, रितेश जाधव, सुरज मुजावर, वैष्णव महाजन, अजय बाराते, प्रतिक करंजखेले व साहिल वाघमारे सहभागी झाले असून आगामी कालावधीत गावात शेतभेटी, मार्गदर्शन सत्रे व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# सप्तरंगी सत्कार समारंभात बालाजी थोटवे यांचे कथाकथन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

उत्तम अभिनय, आवाजातील आरोह अवरोह, आणि कथा पात्रांच्या लकबीसह भेदक नजरेने कथेचा आशय विनोदी शैलीने रसिकांच्या मनमष्तिकात भरुन ठेवणाऱ्या 'असे घडले रामायण' या कथेने रसिक प्रेक्षकांना अक्षरशः शेवटपर्यंत खिळवून ठेवले. येथील कथाकार बालाजी थोटवे यांनी सप्तरंगी सत्कार समारंभात कथाकथन या सत्रात उत्कृष्ट सादरीकरण केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, अनुरत्न वाघमारे, माधव जाधव, डॉ. ज्ञानेश्वर हांडरगुळीकर, एन. सी. भंडारे, देविदास वाघमारे, नागोराव डोंगरे, रणजित गोणारकर आदींची उपस्थिती होती.

# पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प २०१९ च्या प्रस्तावित मार्गानेच कार्यान्वित करावा

- पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी
- लोकप्रतिनिधींची बैठक बोलावण्याची विनंती

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प २०१९ च्या मूळ प्रस्तावित आराखड्यानुसारच (संगमनेर-अकोले मार्गे) कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात पालकमंत्र्यांनी नुकतीच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली असून, जनतेच्या भावना केंद्रीय रेल्वे मंत्र्यांपर्यंत पोहोचविण्याची विनंती केली आहे.

केंद्रीय रेल्वे विभागाने २०१९ मध्ये तयार केलेल्या प्रकल्प अहवालानुसार हा रेल्वे मार्ग नारायणगाव, संगमनेर, अकोले व सिन्नर असा प्रस्तावित होता. या नियोजनानुसार संबंधित भागातील जमिनींचे अधिग्रहण देखील करण्यात आले होते. मात्र, सध्या या प्रस्तावात बदल करून अकोले तालुक्याला वगळण्यात आल्याचे व हा मार्ग आता नारायणगाव-संगमनेर-नाशिक असा प्रस्तावित असल्याचे समोर आले आहे. या बदलामुळे स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. प्रकल्पामध्ये बदल करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्यात आले नसल्याची बाब श्री. विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

सद्यस्थितीत रेल्वे मार्गाच्या प्रकल्प अहवालातील बदलांमुळे लोकप्रतिनिधी व जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. प्रशासकीय स्तरावर याबाबत नेमकी कोणती कार्यवाही सुरू आहे, याची माहिती उपलब्ध होत नाही. तसेच, पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या मार्गात नारायणगाव येथील 'जीएमआरटी' (GMRT) या रेडिओ टेलिस्कोप सेंटरची तांत्रिक अडचण असल्याचे कारण केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी लोकसभेतील निवेदनात स्पष्ट केले आहे.

ही सर्व परिस्थिती विचारात घेऊन, प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संबंधित सर्व लोकप्रतिनिधींची तातडीने बैठक बोलवावी. तसेच, २०१९ च्या मूळ प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी व जनतेच्या भावना केंद्रीय रेल्वे मंत्र्यांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी आग्रही विनंती पालकमंत्री विखे पाटील यांनी केली आहे.

# लाठ्या-काठ्या, बेसबॉल स्टिक व चॉपरने दहशत!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



संगमनेर शहरात नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर पुन्हा एकदा दहशतीचे सावट पसरले असून, विरोधात प्रचार केल्याच्या रागातून नागरिकांवर प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर घटना सोमवारी (दि. २२ डिसेंबर २०२५) रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी १७ जणांविरोधात संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या घटनेत भारतनगर, संगमनेर येथील रहिवासी व रिक्षाचालक मुजीब शाहबुद्दीन शेख आणि साद रहिम शेख हे गंभीर जखमी झाले आहेत. अपक्ष उमेदवाराच्या प्रचारात सहभागी झाल्याचा राग मनात धरून विजयी नगरसेवक व त्यांच्या कार्यकर्त्यांनी घरासमोरच डीजे, फटाके वाजवत “इनको बाहर खिंचो और मारो” अशा घोषणा देत लोखंडी रॉड, बेसबॉल स्टिक व चॉपरने अमानुष मारहाण केल्याचा आरोप पीडितांनी केला आहे.

भारतनगर परिसरात अपक्ष उमेदवार शादाब शेख यांनी नगरपालिकेची निवडणूक लढवली होती. निकालानंतर २१ डिसेंबर रोजी विजयी उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री साडेनऊच्या सुमारास विजयी नगरसेवक नुरमोहम्मद शेख व त्यांचे कार्यकर्ते मिरवणूक घेऊन पीडित मुजीब शेख यांच्या घरासमोर आले. यावेळी शिवीगाळ, घोषणाबाजी व फटाक्यांचा गोंधळ सुरू झाला.

वाद वाढत असताना, एक अल्पवयीन मुलगा मोबाईलवर व्हिडिओ चित्रीकरण करत असल्याचे लक्षात येताच त्याला धक्काबुक्की व मारहाण करण्यात आली. त्याला वाचवण्यासाठी धावलेल्या महिलांनाही धक्काबुक्की करण्यात आली. मध्यस्थी करण्यासाठी पुढे आलेल्या मुजीब शेख यांना लोखंडी रॉड व बेसबॉल स्टिकने बेदम मारहाण करण्यात आली, तर साद शेख यांच्यावर चॉपरने हल्ला करण्यात आला. दोघेही रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळले.

जखमींना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी कारवाई सुरू केली.

या प्रकरणी आरोपी म्हणून

सलीम हाजी शेख, नुर मोहम्मद शेख, इमरान गणी शेख, शेजाज सलीम शेख, दानिश सलीम शेख, सलमान सलीम शेख, वसीम अब्दुल रहमान शेख, उमेर अलीम हाजी, जमील अजीज पठाण, ययाखान समशेरखान पठाण, अदनान शाहिद शेख, जिशान शाहिद शेख, सरजिल महमद शेख, अलीम हाजी शेख, नईम रहमान शेख, तलहा कलीम शेख व रिजवान उस्मान शेख (सर्व रा. भारतनगर, ता. संगमनेर) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एकीकडे “संगमनेर 2.0” च्या विकासाच्या घोषणा दिल्या जात असताना, दुसरीकडे रस्त्यावर झुंडशाही, बेसबॉल स्टिक व शस्त्रांनी नागरिकांवर हल्ले होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि आमदार सत्यजीत तांबे यांच्या समर्थक नगरसेवकांकडून दहशत निर्माण केली जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.



# आरोग्यदूत मंगेश चिवटे यांना 'अटल पुरस्कार' प्रदान

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

समाजकार्य, जनसेवा तसेच वैद्यकीय मदत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत आरोग्यदूत मंगेश चिवटे यांना आज नवी दिल्ली येथे प्रतिष्ठित 'अटल पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. अटल फाउंडेशनच्या वतीने आयोजित भव्य आंतरराष्ट्रीय अटल पुरस्कार व अटल श्री पुरस्कार वितरण समारंभात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी साहेब यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# भंडारदरा धरण : विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अकोले: (समर्थ गांवकरी)**




अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणाला शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या राज्य सरकारने मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शताब्दी महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यानिमित्ताने आगामी एक वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी महोत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे.

या शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमांची रूपरेषा ठरविण्याच्या उद्देशाने जलसंपदा विभागाच्या विश्रामगृहात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली. या बैठकीत महोत्सवाच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच जलसंपदा विभागाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या पर्यटन धोरणाच्या अनुषंगाने भंडारदरा-निळवंडे परिसराचा सर्वांगीण विकास कसा करता येईल, यावर सखोल चर्चा केली.

धरणाचा शताब्दी महोत्सव शासन आणि लोकसहभागातून व्यापक स्वरूपात साजरा करावा, अशी संकल्पना यावेळी निश्चित करण्यात आली. या बैठकीस आमदार श्री. अमोल खताळ, माजी आमदार श्री. वैभव पिचड, जिल्हा बँकेचे संचालक श्री. अमित भांगरे, श्री. मारुती मेंगाळ उपस्थित होते.

यासोबतच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता श्री. प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता श्री. बाळासाहेब शेटे यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# सुशासन सप्ताहानिमित्त विशेष कार्यशाळा संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने देशव्यापी सुशासन सप्ताह सुरु केला आहे. प्रशासन जनतेसाठी काय करते याची माहिती व्हावी, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वसामान्य जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करून देवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज येथे दिले. प्रशासकीय कामात पारदर्शकता, गती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनसेवा अधिक कार्यक्षम करण्यावर या कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कार्यशाळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळेत अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, तहसिलदार (सामान्य प्रशासन) सचिन चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, कुळगाव बदलापूर मुख्याधिकारी मारुती गायकवाड, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक अभिषेक पवार यांच्यासह इतर विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर पुढील ३ महिने बंद राहणार

**जिल्हाधिकारी लवकरच आदेश काढणार**

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

भीमाशंकरः बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणारे क्षेत्र भीमाशंकरमंदिर हे भीमाशंकर येथे होणाऱ्या विकास आराखड्याच्या कामांनिमित्त भाविकांच्या दर्शनासाठी पुढील ३ महिने बंद करण्याबाबतची बैठक आंबेगाव -जुन्नर चे प्रांत गोविंद शिंदे यांच्या अध्यक्षते खाली पार पडली.स्थानिक ग्रामस्थांनी ह्याला सहमती दर्शविली.प्रशासकीय अधिकारी हे भीमाशंकर देवस्था- न ट्रस्ट स्थानिक ग्रामस्थ यांचे म्हणणे व बैठकीचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करतील. यानंतरच जिल्हाधिकारी मंदिर बंद बाबतचा आदेश काढणार आहेत.

श्री क्षेत्र भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी सहावे ज्योतिर्लिंग असून वर्षभरात देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक भक्त पर्यटक व निसर्गप्रेमी येत असतात २०२७ मध्ये नाशिक त्रंबकेश्वर येथे कुंभमेळा होत आहे.प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळावाराणसी अयोध्या उज्जैन या तीर्थक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. त्याच प्रमाणे नाशिक येथे २०२७ रोजी होणाऱ्या कुंभमेळा वेळी भीमाशंकर इतर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे.हे लक्षात घेऊन भीमाशंकरचे व्यवस्थापन व येथे येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी



नव्याने काही कामे करण्यात येणार आहे.२०२७ ला होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा गर्दी व्यवस्थापन व इतर सोई सुविधा यासाठी देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या २८८.१७ कोटींच्या विस्तृत विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. ह्या विकास आराखड्यातील कामांना गती देण्यासाठी व लवकरात लवकर ही कामे पुर्ण करण्यासाठी प्रशासन, भीमाशंकर देवस्थान व स्थानिकग्रामस्थ यांच्या वतीने श्री क्षेत्र भीमाशंकर येथे बैठक घेण्यात आली. यावेळी तीन महिन्यांसाठी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदीर हे भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. ह्या वेळी स्थानिक ग्रामस्थांनी ह्याला सहमती दर्शविली.प्रशासकीय अधिकारी हे भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट स्थानिक ग्रामस्थ यांचे म्हणणे बैठकीचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करतील यानंतरच जिल्हाधिकारी मंदिर बंद बाबतचा आदेश काढणार आहेत.कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने बंद काळामध्ये कोणतीही परिस्थिती उद्भवणार नाही.स्थानिक ग्रामस्थ ब्रह्मवृंद,गुरव पुजारी बांधव तसेच प्रशासकीय अधिकारी व राजकीय नेते यांनी दर्शनासाठी कोणताही अट्टाहास करू नये असा सूचना देण्यात आल्या.यानंतर प्रशासन देवस्थान ट्रस्ट व स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने मंदिर परिसर पायरी मार्ग बस स्थानक वाहनतळ याची पाहणी करण्यात आली.

या वेळी आंबेगाव जुन्नर चे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे, जिल्हा नियोजन अधिकारी गणेश दाणी, भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड.सुरेश कौदरे,खेड तहसिलदार प्रशांत बेडसे,सचिन वाघ,सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार,पुरातत्व विभागाचे सहसंचालक डॉ.विलास वाहणे, उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे शरद बँकेचे संचालक मारुती लोहकरे,भीमाशंकरचे सरपंच दत्तात्रय हिले,निगडाळे सरपंच सविता तिटकारे,स्थानिक ग्रामस्थ,देवस्थान विश्वस्त,उपस्थित होते.